साप्ताहिक

# विश्वनायक

Email: vishvanayak94@gmail.com

• संपादक : बिलाल शेख • VISHVANAYAK Mo.8686888898




■ बीड (महाराष्ट्र) ■ साप्ताहिक ■ द्विभाषिक ■ वर्ष - ०१ ■ अंक - १५ ■ मंगळवार दि.७ एप्रिल २०२६ ■ पीआरजीआय रजि.नं.- एमएचबीआयएल/२५/ए४९८० ■ किंमत २ रू. ■ पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Weekly ■ BILINGUAL ■ Year - 01 ■ Issue - 15 ■ Tuesday Dt. 7 April 2026 ■ PRGI.REG.No. MHBIL/25/A4980 ■ Price - 2 Rupees ■ Pages 4

# माजलगावात 'गोदामाता'चा श्वास गुदमरतोय

## वाळू माफियांचा उन्मत्त नंगानाच; प्रशासन 'धृतराष्ट्र'!

**माजलगाव । विश्वनायक न्यूज**

**ज्या गोदावरी नदीला 'गोदामाता' म्हणून पूजलं जातं, तिच्याच अस्तित्वावर माजलगाव तालुक्यात अवैध वाळू उपशाच्या रूपाने घाला घातला जात आहे. जेसीबी आणि पोकलेनच्या सहाय्याने नदीपात्राचे अक्षरशः खोदकाम सुरू असून, या बेधडक प्रकारामुळे पर्यावरणाचा समतोल धोक्यात आला आहे. माजलगाव परिसरातील गोदावरी नदीकाठ दिवसाढवळ्या आणि रात्रीच्या अंधारात वाळू माफियांच्या ताब्यात गेला आहे. मोठ्या यंत्रसामग्रीच्या मदतीने नदीचे पात्र उध्वस्त केले जात असून, याकडे महसूल व पोलीस प्रशासनाने डोळेझाक केल्याचा आरोप नागरिकांतून होत आहे. विशेष म्हणजे, हा सर्व प्रकार संबंधित यंत्रणांना माहित असूनही कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने 'मूकसंमती' असल्याची चर्चा रंगू लागली आहे.**



अवैध वाळू उपशावर नियंत्रण ठेवण्यासाठी नेमलेली पथके नेमकी काय करत आहेत, असा प्रश्न उपस्थित होत आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांचे या पथकांवर नियंत्रण नाही का? की जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे? असे सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. शहरात बसविण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरे तपासले जातात का, यावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दरम्यान, वाळू माफियांचा वाढता दबदबा स्थानिकांसाठी डोकेदुखी ठरत आहे. रात्रंदिवस सुरू असलेली ट्रॅक्टर आणि डंपरची वर्दळ, मोठा आवाज आणि वेगामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. बाहेरून आलेल्या माफियांकडून गावकऱ्यांना धमकावण्याचे प्रकारही वाढले असून, त्यामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शिवाय, या अवजड वाहनांमुळे परिसरातील रस्त्यांची अक्षरशः दुरवस्था झाली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक अवैध धंद्यांविरोधात कठोर भूमिका घेत असले तरी, त्यांच्याच खालच्या स्तरावर काही अधिकारी व कर्मचारी वाळू माफियांना सहकार्य करत असल्याची शंका व्यक्त केली जात आहे.गोदावरी नदीच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला असताना, प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून अवैध वाळू उपसा थांबवावा, संबंधितांवर कठोर कारवाई करावी आणि नदीपात्राचे संरक्षण करावे, अशी मागणी आता जोर धरत आहे.

### घाटांची अवस्था: जिथे जीवन फुलायला हवे, तिथे यंत्रांचे थैमान!

माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याहद्दीतील सरवर पिंपळगाव, गंगामसाला, मंजरथ, हिवरागाव आणि चिंचवली या वाळू घाटांची सद्यस्थिती पाहिल्यास काळजाचा थरकाप उडतो. नियमांची पायमल्ली करत नदीचा तळ ओरबाडला जात आहे. मंजरथ सारख्या पवित्र स्थळापासून ते सांडस-चिंचवली पर्यंत प्रत्येक ठिकाणी माफियांचे 'राजरोज' साम्राज्य पसरले आहे. गोदावरीचे पात्र छिन्नविच्छिन्न झाले असून निसर्गाचा हा आक्रोश ऐकण्यास कोणाकडेही वेळ नाही.

### प्रशासकीय 'महापाप' आणि टक्केवारीची युती..

सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, हे सर्व तहसीलदार, मंडळ अधिकारी, तलाठी आणि विभागीय अधिकारी यांच्या डोळ्यादेखत सुरू आहे. सामान्य माणसावर कायद्याची काठी उगारणारे हे अधिकारी वाळू माफियांच्या पोकलेनसमोर मात्र नतमस्तक झाले आहेत. या मौनामागे वाळू माफियांकडून मिळणारी 'मलाई' आणि 'टक्केवारी' कारणीभूत असल्याची चर्चा आता जनसामान्यांत उघडपणे होत आहे. प्रशासनाची ही कुंभकर्णी झोप म्हणजे लोकशाहीचा अपमान आहे. अधिकारी 'धृतराष्ट्रा'ची भूमिका बजावत असतील, तर जनतेला आता 'संजय' होऊन सत्य समोर मांडावेच लागेल.

### ग्रामस्थांचा आक्रोश आणि प्रशासनाची निर्ढावलेली वृत्ती

सरवर पिंपळगाव आणि गंगामसाला येथील ग्रामस्थ गेल्या अनेक दिवसांपासून ओरडत आहेत, तक्रारी करत आहेत. पण या भ्रष्ट अधिकाऱ्यांचे कान बहिरे झाले आहेत का? असा संतप्त सवाल विचारला जात आहे. महसूल विभागाच्या या निष्क्रियतेमुळे केवळ पर्यावरणाचे नुकसान होत नसून, भविष्यातील पाणीटंचाई आणि भूगर्भातील पाणी पातळी घटण्याचे मोठे संकट उभे ठाकले आहे.

### खबरदार! जनता आता जाब विचारणार

हा केवळ वाळू चोरीचा विषय नाही, तर हा माजलगावच्या अस्मितेचा आणि अस्तित्वाचा प्रश्न आहे. गोदामातेच्या गर्भावर घाला घालणाऱ्या या नराधमांना आणि त्यांना पाठबळ देणाऱ्या अधिकाऱ्यांना जनता कदापि माफ करणार नाही. प्रशासनाने जर वेळीच ही 'चोरी' थांबवली नाही, तर हा संताप लवकरच रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही. आता वेळ आली आहे जाब विचारण्याची! जर प्रशासन जागे झाले नाही, तर लोकशाहीचा हा आवाज थेट 'जनतेच्या दरबारात' घुमणार हे निश्चित!

# पगारेंना बदनाम करण्याचा कट उधळला!

## मुख्याधिकाऱ्यांच्या अहवालातून विरोधकांचे दात घशात; सर्व आरोप ठरले 'तथ्यहीन'

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगर परिषदेतील गाजलेल्या 'अजिंक्य ट्रेडर्स' देयक प्रकरणात अखेर सत्याचा विजय झाला असून, गणेश तुळशीराम पगारे यांच्यावर करण्यात आलेले सर्व आरोप पूर्णपणे बिनबुडाचे असल्याचे सिद्ध झाले आहे. मा. मुख्याधिकारी यांनी मा.जिल्हा सह आयुक्त नगरपरिषद प्रशासन विभाग यांच्याकडे सादर केलेल्या अधिकृत अहवालाने या प्रकरणातील खोटेपणा चव्हाट्यावर आणला असून, विरोधकांनी रचलेला बदनामीचा हा फुगा फुटला आहे. अजिंक्य ट्रेडर्सच्या नावे २३ सप्टेंबर २०२० रोजी अदा करण्यात आलेल्या २,०४,०५०/- रुपयांच्या देयकावरून गणेश पगारे यांना लक्ष्य करण्यात आले होते.




मात्र, मुख्याधिकाऱ्यांच्या चौकशी अहवालाने यातील दूध का दूध आणि पाणी का पाणी केले आहे. ज्या काळात हे देयक अदा झाले, त्या काळात गणेश पगारे हे बीड नगर परिषदेत कार्यरतच नव्हते! ते त्यावेळी पाटोदा नगरपंचायत येथे आपली सेवा बजावत होते. मग त्यांचा या प्रक्रियेशी संबंध येतोच कुठे? असा सवाल आता उपस्थित होत आहे. गणेश पगारे यांचा मुलगा अजिंक्य पगारे याची नियुक्ती २० नोव्हेंबर २०२० रोजी झाली आहे. म्हणजेच, देयक अदा झाल्यानंतर दोन महिन्यांनी तो सेवेत रुजू झाला. यावरून केवळ वैयक्तिक आकसापोटी हे आरोप केल्याचे स्पष्ट होत आहे. संबंधित देयकाची नस्ती आणि नमुना क्रमांक ६४ ची कसून तपासणी केली असता, त्यावर गणेश पगारे यांची कुठेही स्वाक्षरी आढळलेली नाही. अजिंक्य ट्रेडर्स प्रकरणात गणेश पगारे यांच्यावर झालेले आरोप पूर्णपणे तथ्यहीन आहेत. कागदोपत्री पुराव्यानुसार त्यांचा या प्रकरणाशी काडीचाही संबंध नाही. राजकीय किंवा वैयक्तिक हेतूने एखाद्या निष्कलंक अधिकाऱ्याची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न कसा अंगाशी येतो, याचे हे जिवंत उदाहरण आहे. गणेश पगारे यांच्यावर करण्यात आलेले आरोप फेटाळले गेल्याने आता त्यांच्या समर्थकांमध्ये आनंदाचे वातावरण असून, खोटे आरोप करणाऱ्यांनी जाहीर माफी मागावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# परळीत जन्म प्रमाणपत्रासाठी नागरिकांना आठ महिने प्रतीक्षा!

## आठ महिन्यांनंतरही आदेश नाही – प्रशासन झोपेत?

## जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष घालावे– तहसील प्रशासनाविरुद्ध शहरात रोष वाढला

**परळी वैजनाथ । सुमित गिरी**

परळी तहसील कार्यालयाच्या भोंगळ व निष्काळजी कारभाराचा फटका सामान्य नागरिकांना बसत असल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे. जन्म प्रमाणपत्र मिळवण्यासाठी शासनाने ठरवलेली प्रक्रिया जास्तीत जास्त ४५ दिवसांची असताना, प्रत्यक्षात नागरिकांना तब्बल सहा महिने उलटूनही प्रमाणपत्र मिळत नसल्याची धक्कादायक बाब उघड झाली आहे.

माहितीनुसार, गेल्या आठ महिन्यांपासून अनेक नागरिकांनी जन्म प्रमाणपत्रासाठी अर्ज करूनही त्यांच्या अर्जांवर कोणतीही अंतिम ऑर्डर निघालेली नाही. त्यामुळे नागरिकांना वारंवार तहसील कार्यालयाच्या चकरा माराव्या लागत असून, प्रशासनाकडून कोणतेही समाधानकारक उत्तर दिले जात नसल्याची तक्रार वाढत आहे. यापूर्वीही जन्म प्रमाणपत्र प्रकरणात अनियमितता आणि अर्जदारांनी खोटी माहिती आढळून आल्याने मागील वर्षी शहरातील सुमारे ४० जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले होते. मात्र, त्या कारवाईनंतरही तहसील प्रशासनात कोणताही सुधार दिसून न आल्याने प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

दरम्यान, नवीन अर्जदारांनी नियमांनुसार अपील करूनही त्यांच्या प्रकरणांवर सहा महिन्यांपासून निर्णय प्रलंबित ठेवण्यात आल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. जर अर्जदारांकडून पाहिली मध्ये काही तुरटी असल्यास तर ते पण सांगितले जात नाही, जेणेकरून सांगितल्यावर त्रुटी दुरुस्त करता येईल, तहसील कार्यालयातील अधिकाऱ्यांचे या प्रश्नाकडे अजिबात लक्ष नाही,अशी चर्चा शहरभर सुरू आहे. या पार्श्वभूमीवर, संबंधित अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी यांनी तातडीने या प्रकरणात लक्ष घालून तहसील प्रशासनाची चौकशी करावी व प्रलंबित प्रकरणे त्वरित निकाली काढावीत, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. परळी तहसीलच्या कारभारावर आता गंभीर प्रश्न उपस्थित झाले असून, प्रशासनाने तातडीने कार्यवाही न केल्यास आंदोलनाचा इशाराही नागरिकांकडून दिला जात आहे.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत सादोळ्याचा दुचाकीस्वार ठार

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील सादोळा येथे पंढरपूर-खामगाव महामार्गावर आज दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास अज्ञात वाहनाने धडक दिल्याने एका दुचाकीस्वाराचा दुर्दैवी मृत्यू झाला. अशोक जिजाभाऊ गोजे (वय ४०, रा. सादोळा) असे या भीषण अपघातात मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तीचे नाव आहे. भरधाव वेगाने येणाऱ्या अज्ञात वाहनाने गोजे यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली आणि चालक वाहन घेऊन घटनास्थळावरून फरार झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, अशोक गोजे हे आपल्या कामासाठी दुचाकीवरून जात असताना हा अपघात घडला. धडक इतकी भीषण होती की गोजे गंभीर जखमी होऊन त्यांचा जागीच प्राण गेला. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी मदतीसाठी धाव घेतली आणि पोलिसांना पाचारण केले. माजलगाव ग्रामीण पोलिसांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला असून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. या अपघातामुळे सादोळा परिसरात मोठी शोककळा पसरली असून परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. फरार झालेल्या अज्ञात वाहन चालकाचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही आणि इतर माहितीच्या आधारे तपास चक्रावून फिरवली आहेत. या प्रकरणी माजलगाव ग्रामीण पोलीस अधिक तपास करत आहेत.

# भोंदूबाबा खरात प्रकरणी माकपची जिल्हाभर निदर्शने

**बीड । प्रतिनिधी**

भोंदूबाबा अशोक खरात याच्या कारस्थानात महिला आयोगाच्या अध्यक्षांसह अनेक मंत्री, आमदार, लोकप्रतिनिधी, अधिकारी सामील झालेले किंवा बळी पडलेले उघड होत असताना देशात आणि राज्यात ज्या विचाराचे सरकार आहे त्यामुळे श्रद्धेच्या नावाखाली अशा अंधश्रद्धांना पाठबळ व प्रतिष्ठा मिळाली आहे. बुवाबाजीला शरण गेलेल्या संविधानिक पदावरील व्यक्तीविरोधात कारवाई करण्यासाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने सोमवार दि ६ रोजी जिल्हाधर निदर्शने केली. राज्यात सध्या तंत्र-मंत्र, अंगारे-धुपारे करून अडचणीत सापडलेल्यांचे व महिलांचे शोषण करण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यात असलेल्या अशोक खरात या बुवा-बाबाने यांद्वारे केलेल्या शोषणाला महिला व सामान्य लोक मोठ्या प्रमाणात बळी पडले आहेत. राज्य सरकारच्या वतीने राज्यातील या सर्व भोंदू बाबांचा बंदोबस्त करण्यासाठी विशेष मोहीम राबवा. प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये अंधश्रद्धा निर्मूलन कक्षाची स्थापना करून ते कार्यान्वित करण्याचा शासन निर्णय त्वरित अमलात आणा. जादूटोणा विरोधी कायद्याचे नियम तयार करून या कायद्याची कठोर अंमलबजावणी करा. सोशल मीडियातून होणाऱ्या बाबा-बुवा, ज्योतिषी, मंत्र-तंत्र यांच्या अंधश्रद्धा पसरवणाऱ्या जाहिरातींवर बंदी आणा. अशा जाहिरातींचे नियमन करणारी स्वतंत्र यंत्रणा तयार करा.या मागणी करिता बीड जिल्हा सचिव कॉ.ॲड.अजय बुरांडे व जिल्हा कमिटी मार्फत जिल्हयातील अंबाजोगाई, धारूर, परळी, माजलगाव, सिरसाळा निदर्शने करण्यात आली.

## नगरसेवक अशपाक ईनामदार यांनच्या तक्रारीची दखल

# बेकायदेशीर सिमेंट मिक्सर प्लान्टवर महसूल विभागाचा पंचनामा

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील बार्शी रोडवरील श्री संत भगवानबाबा प्रतिष्ठान परिसरात बेकायदेशीररित्या सुरू असलेल्या सिमेंट मिक्सर प्लान्ट विरोधात नगरसेवक आशफाक इनामदार यांनी केलेल्या तक्रारीची महसूल विभागाने दखल घेतली आहे. रविवारी (दि. ५ एप्रिल) महसूल पथकाने घटनास्थळी भेट देत संबंधित प्लान्टचा पंचनामा केला. यापूर्वीही स्थानिक नागरिकांनी या मिक्सर प्लान्टविरोधात अनेक तक्रारी केल्या होत्या. त्यानुसार महसूल अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करत पंचांसमक्ष पंचनामा नोंदवला. या वेळी सिमेंट, वाळू व खडीमधून उडणाऱ्या धुळीमुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले. तसेच हवा व ध्वनी प्रदूषणामुळे लहान मुलांमध्ये आजार वाढत असल्याच्या तक्रारीही नोंदवण्यात आल्या.




सदर ठिकाणी विनायक कन्स्ट्रक्शन कंपनीचा सिमेंट मिक्सर प्लान्ट सुरू असल्याचे आढळून आले. २०२१ पासून हा प्लान्ट कार्यरत असून तो अनधिकृत असतानाही संबंधितांना परवानगी कशी देण्यात आली, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. तसेच नगरपालिकेची वीज वापरण्याबाबतही नियमबाह्य बाबी समोर आल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दरम्यान, या प्लान्टमुळे परिसरातील नागरिकांना मोठ्या प्रमाणावर प्रदूषणाचा त्रास सहन करावा लागत असून आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे संबंधित बेकायदेशीर प्लान्टवर दंडात्मक कारवाई करून तो तात्काळ सील करावा, अशी मागणी नगरसेवक आशफाक इनामदार यांच्यासह आनंद वीर यांनी केली आहे.

# व्यापाऱ्याला मारहाण करत दहशत करुन गाडीच्या काचा फोडणाऱ्याला पोलिसांचे अभय?

## चौसाळ्यातील व्यापाऱ्याची थेट एसपींकडे धाव नेकनूर पोलिसांच्या कार्यपद्धतीवर पुन्हा प्रश्नचिन्ह

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील चौसाळा येथील एका किराणा व्यापाऱ्याला मारहाण करत चारचाकी गाडीची तोडफोड करून जीव मारण्याच्या धमक्या दिल्याची गंभीर घटना समोर आली आहे. याप्रकरणी आरोपीवर गुन्हा दाखल करण्याऐवजी पोलिसांनी केवळ एनसी नोंद करून त्याला अभय दिल्याचा आरोप होत असून, संतप्त व्यापारी शिंदे यांनी थेट पोलीस अधीक्षकांकडे धाव घेतली आहे.

तक्रारदार प्रशांत रेवननाथ शिंदे (रा. चौसाळा) यांनी दिलेल्या माहितीनुसार, रमेश उर्फ अण्णा वसंत जाधव या व्यक्तीने २८ मार्च रोजी रात्री दारूच्या नशेत येऊन त्यांच्या दुकानासमोर गोंधळ घालत जातिवाचक शिवीगाळ करत दुकानासमोर असलेल्या एर्टिगा गाडीवर दगडफेक करून काच फोडली. या घटनेमुळे चौसाळा मुख्य रस्त्यावर काही काळ तणाव निर्माण झाला होता. या घटनेनंतर नेकनूर पोलीस ठाण्यात तक्रार दिली असता, पोलिसांनी एफआयआर नोंदविण्याऐवजी एनसीआर (क्र.१६४/२०२६) दाखल करून प्रकरण दडपल्याचा आरोप करण्यात आला आहे.



दरम्यान, तक्रार दिल्याचा राग मनात धरून आरोपीने ३० मार्च रोजी सकाळी पुन्हा गाडीवर दगडफेक करत समोरील व साईड काचा फोडल्या तसेच बोनटचेही नुकसान केले. या घटनेत सुमारे दीड लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे तक्रारदाराने नमूद केले आहे. शिंदे यांनी पुढे असा गंभीर आरोप केला आहे की, संबंधित आरोपी हा गुंड प्रवृत्तीचा असून चौसाळा बस स्थानक परिसरात बेकायदेशीर धंदे हातभट्टी, दारू, गांजा विक्री करतो यामुळे त्याचे पोलिसांशी संबंध असून तो गुंड प्रवृत्तीचा असल्याचा देखील उल्लेख केला आहे. पोलीसाची असलेल्या संबंधामुळेच पोलिसांनी त्याच्यावर कठोर कारवाई टाळल्याचे सांगितले जात आहे. एवढेच नव्हे, तर तक्रार मागे न घेतल्यास खोटा गुन्हा दाखल करून जेलमध्ये टाकण्याची धमकी पोलीस निरीक्षकांनी दिल्याचाही आरोप अर्जात करण्यात आला आहे.

या संपूर्ण प्रकरणामुळे चौसाळा परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, तक्रारदाराने स्वतःच्या व कुटुंबाच्या सुरक्षेबाबतही चिंता व्यक्त केली आहे. संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून आरोपीसह संबंधित पोलिसांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, या प्रकरणाकडे बीड जिल्हा पोलीस प्रशासन कशाप्रकारे पाहते आणि पुढे कोणती कारवाई होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# संत साहित्याच्या माध्यमातून तरुण पिढीला दिशा देणार : ह.भ.प. स्वामी योगीराज महाराज

**बीड । प्रतिनिधी**

आजची तरुण पिढी व्यसनाधीनतेकडे झुकत असून शालेय विद्यार्थी मोबाईलच्या विळख्यात अडकले आहेत. या पिढीचे मन आणि मत परिवर्तन करण्यासाठी संत साहित्य हाच रामबाण उपाय आहे. संत विचारांच्या माध्यमातून तरुणांना व्यसनमुक्त करून समाजाला योग्य दिशा देण्याचा आमचा संकल्प आहे,असे प्रतिपादन ह.भ.प. स्वामी योगीराज महाराज यांनी केले. शिदोड येथे आयोजित करण्यात आलेल्या ४७ व्या भव्य नारळी अखंड हरिनाम सप्ताह आणि संगीत रामकथा ज्ञानयज्ञ सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. हा भव्य आध्यात्मिक सोहळा रविवार, ५ एप्रिल २०२६ ते १२ एप्रिल २०२६ दरम्यान श्री क्षेत्र संस्थान रामगडच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे.

या पत्रकार परिषदेत व्यसनमुक्ती व संस्कारांचा संदेश समाजातील वाढत्या व्यसनाधीनतेबाबत चिंता व्यक्त करत महाराज म्हणाले की, श्रीक्षेत्र रामगड यांच्यावतीने शिदोड येथील भव्य दिव्य अशा ४७ व्या नारळी सप्ताहाच्या माध्यमातून केवळ अध्यात्म नव्हे, तर सामाजिक परिवर्तन घडवण्यासाठी शालेय स्तरावर संस्कारांची पेरणी करणे हाच, मुख्य उद्देश आहे. त्यामुळे या नारळी सप्ताहाच्या माध्यमातून तरुण पिढी आणि विद्यार्थ्यांना मोबाईल व इतर व्यसनांपासून दूर ठेवण्यासाठी विशेष प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या नारळी सप्ताहत केवळ धार्मिक कार्यक्रमापुरता मर्यादित नसून समाजोपयोगी उपक्रमांनी समृद्ध असणार आहे. यामध्ये शेतकरी प्रबोधन करणार आहोत.

बीड जिल्ह्यासह राज्यातील कोणत्याही शेतकऱ्यांनी आत्महत्या सारखे पाऊल उचलू नये म्हणून त्यांचे खंबीर मनोबल वाढविण्यासाठी प्रबोधन केले जाणार आहे. शेतकऱ्यांना मानसिक आधार देण्यासाठी मार्गदर्शन करणार आहोत. तसेच रक्तदान शिबिर, पर्यावरण संवर्धन, वृक्षारोपण आणि



प्लास्टिकमुक्ती अभियान, स्वच्छता अभियान, स्वच्छ व निरोगी परिसराचा संदेश या माध्यमातून समाजातील विविध घटकांपर्यंत सकारात्मक विचार पोहोचवण्याचा प्रयत्न केला जात आहे.

**भक्तीमय वातावरणात दैनंदिन कार्यक्रम**

या सप्ताहादरम्यान दररोज पहाटे काकडा भजन, विष्णूसहस्त्रनाम, गाथा भजन, दुपारचे संगीत रामकथा, सायंकाळी हरिपाठ आणि रात्री कीर्तन व जागर असे भरगच्च आध्यात्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. संपूर्ण परिसर भक्तीरसात न्हाऊन निघणार आहे.

**नामवंत कीर्तनकारांची मांदियाळी**

या सप्ताहात राज्यातील नामवंत कीर्तनकार आपली सेवा देत आहेत. विशेषतः समाजप्रबोधनकार निवृत्ती महाराज इंदुरीकर, ज्ञानेश्वर महाराज तांबे, संजय महाराज पाचपोर, जयवंत महाराज बोधले, पुरुषोत्तम महाराज पाटील यांसारख्या दिग्गजांचे कीर्तन आणि प्रवचनाचा भाविकांना लाभ होणार आहे. तसेच, ह.भ.प. रामायणाचार्य अंकुर महाराज साखरे यांच्या रसाळ वाणीतून सादर होणारी 'संगीत रामकथा' हे सोहळ्याचा विशेष आकर्षण ठरणार आहे.

**परंपरा आणि प्रेरणेचा वारसा**

ब्रह्मलीन महात्मा राम बाबा यांच्या कृपाशीर्वादाने तसेच ह.भ.प. किसन बाबा आणि ह.भ.प. लक्ष्मण बाबा यांच्या प्रेरणेने हा सोहळा पार पडत आहे. ह.भ.प. गुरुवर्य महंत स्वामी योगीराज महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली हा ज्ञानयज्ञ आयोजित करण्यात आला आहे. सदरील नारळी सप्ताहचा आरंभ उद्या रविवार दिनांक एप्रिल रोजी होत आहे. तर रविवार, १२ एप्रिल रोजी सकाळी 'काल्याचे कीर्तन' आणि त्यानंतर महाप्रसादाने सप्ताहाची सांगता होणार आहे.

**भक्तिमय 'ज्ञानयज्ञा'चा लाभ घ्यावा – आवाहन**

बीड जिल्ह्यासह मराठवाड्यातील भाविकांनी, विशेषतः तरुणांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजक आणि शिदोड ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे. या पत्रकार परिषदेच्या प्रसंगी ह.भ.प. योगीराज महाराज यांच्यासह शिदोड येथील आयोजक समितीतील सर्व पदाधिकारी, सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---


### जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयाने काढले पत्र

# मतदार नोंदणी अधिकारी आणि तहसीलदारांना गांभीर्य नाही किंवा ते झोपेतच : एस.एम.युसूफ

**बीड । प्रतिनिधी**

एसआयआर प्रक्रिया राबवितांना मतदार याद्यांमध्ये असलेल्या असंख्य त्रुटी शासनासह प्रशासनाला दिलेल्या तीन निवेदनांमधून सविस्तरपणे मांडल्यानंतर या निवेदनाची दखल घेऊन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयाने पत्र काढले मात्र मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी बीड आणि सहायक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार बीड यांनी त्यावर कोणती कारवाई केली? याविषयी आठवडा उलटूनही उत्तर न दिल्याने या दोन्ही अधिकाऱ्यांना या विषयाचे गांभीर्य नसल्याचे किंवा ते झोपेत असल्याचे सडेतोड मत याविषयी पाठपुरावा करणारे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी मांडले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, मतदार याद्या दुरुस्त करण्याकरिता निवडणूक आयोगाकडून सुरू करण्यात आलेली एसआयआर प्रक्रिया या प्रक्रियेशी संबंधित प्रशासनिक अधिकारीच गांभीर्याने घेत नसल्याचे दिसून आले आहे. सन २००० च्या असो की, २००२, २००४ किंवा २०२५ च्या असो,



जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालय, बीड
( निवडणूक विभाग )

Digitally signed by
Ghode Manoj Raghunath
Date: 30-03-2026
13:34:37



प्रत्येक मतदार याद्यांमध्ये असंख्य मृतांची नावे आहेत. विवाह होऊन जिल्हा बाहेर गेलेल्या महिलांची नावे, मतदारांचे पत्ते आणि वय यात अतोनात अक्षम्य चुका असताना, अशा सदोष मतदार याद्या घेऊन निवडणूक आयोगाने दिलेल्या आदेशानुसार प्रशासन एसआयआर प्रक्रिया राबवित असल्याने या सर्व बाबी या अगोदर दिनांक ०६ मार्च २०२६, १७ मार्च २०२६ आणि ३० मार्च २०२६ रोजी जिल्हाधिकारी यांच्यासह भारतीय निवडणूक आयोगाचे मुख्य आयुक्त, महाराष्ट्राचे राज्यपाल, मुख्यमंत्री, गृहमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री आणि महाराष्ट्र राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त यांना पाठविलेल्या निवेदनातून मांडण्यात आलेल्या आहेत.

याची दखल घेऊन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालय, बीड (निवडणूक विभाग) यांनी दिनांक ३० मार्च २०२६ रोजी मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी बीड आणि सहायक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार बीड यांच्या नावे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांच्या निवेदनाचा संदर्भ देऊन प्रशासकीय पत्र काढले.

त्यात याबाबत दोन्ही अधिकाऱ्यांनी आपल्या स्तरावरुन उचित कार्यवाही करावी आणि केलेल्या कार्यवाहीबाबत संबंधीत एस.एम.युसूफ (पत्रकार) बीड यांना आपले स्तरावरुन कळवावे. तसेच या कार्यालयास अवगत करावे, असे आदेशित केले. त्याला एक आठवड्याचा कालावधी उलटून गेला आहे. तरीही मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी बीड आणि सहायक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार बीड यांनी मतदार याद्या दुरुस्त करण्याकरिता कोणते कार्य केले किंवा करणार आहेत? मतदार यादी मध्ये एकही मृत मतदाराचे नाव राहणार नाही. सन २००० नंतर विवाहित झालेल्या महिला मतदारांची नावे एसआयआर प्रक्रियेनंतर तयार करण्यात येणाऱ्या नवीन मतदार याद्या मध्ये येण्यापासून वंचित राहणार नाहीत. याकरिता प्रशासनिक अधिकारी म्हणून ते नेमके काय कार्य करतील? याबद्दल अजूनही या दोन्ही जबाबदार अधिकाऱ्यांनी कळविलेले नाही.

यामुळे एकीकडे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयाने पत्र काढून जागरूकता दाखविली असली तरी मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी बीड आणि सहायक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार बीड हे मात्र अजूनही झोपेतच असल्याचे किंवा याचे गांभीर्य त्यांना नसल्याचे दिसून येत आहे. असे सडेतोड मत याविषयी सातत्याने पाठपुरावा करणारे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी मांडले आहे.



राष्ट्रपिता महात्मा गांधी व्यसनमुक्ती राज्यस्तरीय पुरस्कार २०२४–२०२५ तत्वशील कांबळे यांना मिळाल्याबद्दल सत्कार करताना आधार व्यसनमुक्ती केंद्राचे संस्थापक तेजस घुमरे, आधारभूषण मुक्ती केंद्राचे अधीक्षक संजय भडगळे, सानप, काकडे, खरात, राज शिराळे इत्यादी.

# प्रामाणिक कामाची शिक्षा? तुकाराम मुंढे यांची २५ वी बदली : जिलानी शेख

**पाटोदा । प्रतिनिधी**

२००५ बॅचचे महाराष्ट्र कॅडरचे आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे हे राज्यातील प्रामाणिक, पारदर्शक आणि कडक प्रशासनासाठी ओळखले जाणारे अधिकारी म्हणून परिचित आहेत. मात्र, त्यांच्या २१ वर्षांच्या सेवाकाळात तब्बल २५ वेळा बदली झाल्याने प्रशासनातील कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. प्रामाणिकपणे आणि निडरपणे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना वारंवार बदलीच्या माध्यमातून शिक्षा दिली जाते का, असा सवाल निर्माण झाला असून, त्यांच्या कर्तव्यनिष्ठेवर राज्यकर्त्यांकडून २५ वा बळी घेतला जात असल्याचे दिव्यांग संघर्ष समिती, महाराष्ट्रचे जिलानी शेख यांनी म्हटले आहे.

तुकाराम मुंढे यांची कारकीर्द ही कठोर निर्णयक्षमता, भ्रष्टाचाराविरुद्धची भूमिका आणि प्रशासनातील शिस्त यासाठी ओळखली जाते. त्यांनी ज्या-ज्या पदांवर काम केले, त्या प्रत्येक ठिकाणी पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यांना प्राधान्य दिले. त्यामुळे अनेकदा सत्ताधारी व स्थानिक स्तरावरील प्रभावशाली घटकांशी त्यांचा संघर्षही झाला असल्याचे दिसून आले आहे. याच पार्श्वभूमीवर त्यांच्या वारंवार बदल्यांकडे पाहिले जात असून, ही केवळ प्रशासकीय प्रक्रिया नसून दबावाचे साधन असल्याचा आरोप विविध स्तरांतून होत आहे.



दैनिक मिल्लत मित्र व मिलन ग्रुप ऑफ स्कूल्स यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भव्य वर्धापन दिन व ईद–मिलन सोहळ्यात मान्यवरांची उपस्थिती लाभली. या प्रसंगी आमेर सलीम सर व उमेर सलीम सर यांना शुभेच्छा देताना समाजसेवक मुसा खान पठाण, जाफर खान लाला, पत्रकार पठाण अमरजान व सय्यद मुजीब शहा हे मान्यवर छायाचित्रात दिसत आहेत.



झहीर शाह कादरी यांच्या मुलांच्या लग्न समारंभ आयोजित पार पडला. त्या प्रसंगी लग्नाची शुभेच्छा देऊन सत्कार करताना बीजेपी अल्पसंख्यक जिल्हा अध्यक्ष शेख इर्शाद भाई, बीजेपी नेता मूसा खान पठाण, फारुक भाई. शेख बिलाल, शेख वसीम, शेख लाला व शेख अन्सार इतर दिसत आहेत.

# दुःखाच्या राखेतून पुन्हा उभारी घेण्यासाठी 'हिमायत फाउंडेशन'चा माणुसकीचा हात; पिंजारी कुटुंबाला ४५ हजारांची मदत

**गेवराई । प्रतिनिधी**

नियतीचा घाला कधी आणि कसा येईल याचा नेम नसतो. आयुष्याची पुंजी लावून उभा केलेला संसार आणि पोटापाण्याचा आधार डोळ्यादेखील खाक होताना पाहण्याचे दुःख काय असते, हे शेख चांदभाई शेख हुसेन पिंजारी यांच्या कुटुंबापेक्षा अधिक कोणालाही ठाऊक नसेल. मात्र, या कठीण प्रसंगात 'हिमायत फाउंडेशन'ने मदतीचा हात पुढे करत माणुसकीचे दर्शन घडवले आहे.

शेख चांदभाई हे गादी कारखान्याच्या व्यवसायातून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. घरात आधीच गरिबी पाचवीला पुजलेली. त्यातच त्यांच्या दोन विधवा मुलींच्या संसाराचा आणि त्यांच्या मुलांच्या पालनपोषणाचा भारही याच वृद्ध दांपत्याच्या खांद्यावर होता. १८ मार्च रोजी चांदभाईंच्या पत्नी दुकानात काम करत असताना शॉर्ट सर्किटमुळे अचानक भीषण आग लागली. काही मिनिटांतच संपूर्ण दुकान, कच्चा माल आणि गल्ल्यातील रोख रकमेसह सर्व काही जळून खाक झाले. आयुष्याचा आधार असलेल्या या



दुकानाची राख झाल्याने पिंजारी कुटुंब पूर्णपणे हतबल झाले होते. ही दुर्दैवी घटना समजताच सामाजिक कार्यात सदैव अग्रेसर असणाऱ्या 'हिमायत फाउंडेशन'ने या कुटुंबाला पुन्हा उभारी देण्यासाठी पुढाकार घेतला. शेख चांदभाई यांचे दुकान पुन्हा उभे राहावे आणि त्यांच्या उपजीविकेचा प्रश्न सुटावा, या उद्देशाने फाउंडेशनच्या वतीने त्यांना ४५,००० रुपयांचा धनादेश (चेक) आर्थिक मदत म्हणून सुपूर्द करण्यात आला.

यावेळी हिमायत फाउंडेशनचे अध्यक्ष मुफ्ती उमर ईशाअती, माजी नगरसेवक सय्यद एजाज मेंबर, हाफिज अनवर साहब, मजहर बागवान, फहाद चाऊस, पत्रकार शेख इरशाद, फाउंडेशनचे सचिव शेख मुजीब, सहसचिव सय्यद शाकेर, सय्यद अब्दुल वाहेद, सोहेल पठाण, शेख निसार, शहेनशहा पठाण लुकमान खान, जिशान खान, सय्यद गुफरान, पठान मुजाहेद आदी मान्यवर उपस्थित होते. एका गरीब कुटुंबाचे हसते-खेळते घर आगीने हिरावून नेले, अशा वेळी त्यांना केवळ सांत्वनाची नाही तर भक्कम आधाराची गरज होती. ती पूर्ण करण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे, अशा भावना यावेळी फाउंडेशनच्या सदस्यांनी व्यक्त केल्या. हिमायत फाउंडेशनच्या या मदतीमुळे पिंजारी कुटुंबाच्या डोळ्यांतून साश्रू नयनांनी कृतज्ञता व्यक्त होत होती.

# परीक्षांच्या काळात 'पटपडताळणी' चा अट्टाहास कशासाठी?

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील शाळांमध्ये सध्या वार्षिक परीक्षांचे वातावरण असून इयत्ता ९ वी, ११ वी आणि पायाभूत (झ-ढ) चाचण्यांचे नियोजन सुरू आहे. अशा अत्यंत व्यस्त काळात शिक्षण विभागाने 'प्रत्यक्ष पटपडताळणी'चे आदेश दिल्याने शिक्षक आणि मुख्याध्यापकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. हा अघोरी निर्णय रद्द करावा किंवा पुढे ढलावा, अशी आग्रही मागणी महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीने शिक्षण मंत्री ना. श्री. दादाजी भुसे यांच्याकडे केली आहे.

समितीचे उपाध्यक्ष खंडेराव जगदाळे यांनी या संदर्भात शिक्षण मंत्री आणि शिक्षण संचालकांना लेखी निवेदन पाठवून वस्तुस्थितीकडे लक्ष वेधले आहे. शासनाने ११, १५ आणि २२ एप्रिल रोजी झ-ढ परीक्षांचे आयोजन केले आहे. याच काळात ९ वी आणि ११ वी च्या महत्त्वाच्या विषयांच्या परीक्षाही आहेत. अशा वेळी प्रत्यक्ष पटपडताळणी लादल्याने परीक्षेच्या कामात मोठी अडचण निर्माण होणार आहे. एका बाजूला विद्यार्थ्यांचे मूल्यमापन आणि दुसऱ्या बाजूला प्रशासकीय पडताळणी, अशा दुहेरी कत्रीत शिक्षक अडकले आहेत. यामुळे त्यांच्यावर विनाकारण मानसिक ताण येत असल्याची भावना निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे. दुसरीकडे शासनाने आधीच ऑनलाइन संचमान्यता ग्राह्य धरून पदे निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. जेव्हा ऑनलाइनचा पारदर्शक पर्याय उपलब्ध आहे, तेव्हा पुन्हा प्रत्यक्ष पडताळणी करून वेळ आणि मनुष्यबळ वाया का घालवले जात आहे? असा सवाल ही विना अनुदानित शाळा कृती समितीने केला आहे.

समितीच्या प्रमुख मागण्या: सद्यस्थितीतील परीक्षांचा विचार करून प्रत्यक्ष पटपडताळणीचा आदेश तात्काळ रद्द करावा. ही प्रक्रिया पुढे ढकलून ती पुढील शैक्षणिक वर्षात ३० सप्टेंबरच्या पटसंख्येवर आधारित घेण्यात यावी. वारंवार बदलणारे आदेश न काढता, शिक्षण विभागाने निश्चित अशी एकच पडताळणी प्रक्रिया ठेवावी. या निवेदनावर समितीचे अध्यक्ष एस. यू. म्हासकर, कार्याध्यक्ष आर. झेड. बावीसकर, राज्य संघटक पुंडलिक रहाटे, वैजिनाथ चाटे, जितेंद्र डोंगरे, विजयसिंह शिंदे, मुक्ता मोटे मॅडम आणि बीड जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ यांच्यासह राज्यातील सर्व जिल्हाध्यक्षांचे समर्थन आहे. आता शासन यावर काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण शैक्षणिक क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

# धम्मदीप बुद्ध विहारात चैत्र पौर्णिमा उत्साहात साजरी

**बीड । प्रतिनिधी**

बौद्ध धम्मात प्रत्येक पौर्णिमेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. अनेक महत्त्वपूर्ण घटना तथागतांच्या जीवनात पौर्णिमेलाच घडल्या आहेत. खडतर तपश्चर्या करूनही सिद्धार्थला दुःख मुक्तीचा मार्ग सापडला नाही. शरीर अस्थिपंजर झाले होते, त्यानंतर ते उरूवेलेला वटवृक्षाखाली ध्यानस्थ बसले असता सुजाता नावाच्या राजकन्यांनी त्यांना ह्याच चैत्र पौर्णिमेला तिची मनोकामना पूर्ण झाल्यामुळे सिद्धार्थला वनदेवता समजून खीर प्राशन करायची विनंती केली होती. त्या विनंतीनुसार सिद्धार्थाने खीर प्राशन केल्यानंतर त्राण प्राप्त झाले व पुढे गयेला पिंपळवृक्षाखाली ध्यानधारणा केल्यानंतर वैशाख पौर्णिमेला दिव्य ज्ञान प्राप्त झाले. तरी प्रत्येकाने तथागतानी सांगितलेल्या मार्गाचा जीवन जगण्याकरिता ध्यानधारणा, विपश्यना करणे, आपले मन जे राग, लोभ, द्वेष, अशांततेने भरले आहे ते शांती, प्रेम, मैत्री, करूणा दान करण्यास सतत प्रवृत्त राहील व आपल्या जीवनात तसे आचरण ठेवणे किती गरजेचे आहे व माणसाचा चेहरा हा अंतर्मनाचा आरसा आहे तरी अंतरमनात राग, लोभ, द्वेष, अशांततेची धूळ बसू न देता त्रिशरण,



पंचशील, अष्टांगिकमार्ग व दहा पारमितींचे केवळ बुद्धविहारात जाऊन सामुदायिक वाचन न करता ते आपल्या जीवनात आचरण करून तथागताने सांगितलेल्या दुःखमुक्तीच्या मार्गावर चालण्याकरिता सतत प्रयत्नशील असले पाहिजे. ह्यातच सर्व मानव जातीचे कल्याण आहे असे तथागतच्या जीवनातील अनेक प्रसंग सांगून धम्मदीप बुद्ध विहारात चैत्र पौर्णिमा निमित्त आयोजित वंदना प्रसंगी प्रशांत वासनिक यांनी प्रतिपादन केले.

सर्वप्रथम तथागतास पुष्प व महामानवांच्या प्रतिमांना पुष्पमाला अर्पण करून दीप प्रज्वलीत करून सामुदायिक वंदना घेण्यात आली. या कार्यक्रम प्रसंगी प्रशांत वासनीक व सुजाता वासनीक या दांपत्याने इगतपुरी येथे दहा दिवसीय विपशना शिबिर करून आल्याबद्दल धम्मदीप बुद्ध विहार, महामानव अभिवादन ग्रुप बीड व वाचाल तर वाचाल वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने त्यांचा पुष्पगुच्छ भिमाई, भारतीयांचा राष्ट्रीय धर्म व नवी पहाट हा काव्यसंग्रह पुस्तक देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त एलआयसी प्रबंधक यु.एस. वाघमारे तर प्रमुख पाहुणे म्हणून बौद्धाचार्य तथा समता सैनिक दलाचे मेजर जनरल कॅप्टन राजाभाऊ आठवले लाभले होते. विचार मंचावर महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम. भोले, एस.एस. सोनवणे सेवानिवृत्त पीएसआय तानाजी शिनगारे, अरुण वाघमारे,उमेश चांदणे यांची प्रमुख उपस्थिती होती. उमेश चांदणे परिवारातर्फे देखील वासनिक दांपत्याचा शाल, पुष्पगुच्छ व तथागताची फोटो फ्रेम देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अँड.तेजस वडमारे यांनी तर प्रस्ताविक डि.जी वानखेडे यांनी केले.

याप्रसंगी सुजाता वासनिक यांनी विपश्यनेचे महत्त्व व जीवनात होणारे बदल याविषयी स्वः अनुभव सांगितले. अध्यक्षीय समारोपात यु.एस.वाघमारे यांनी दर पौर्णिमा साजरी करणे, दर रविवार बुद्ध विहारात जाऊन धम्मा बद्दल माहिती करून घेणे तसेच जीवनात विपश्यनेचे महत्त्व अनेक उदाहरणाद्वारे समजावून सांगितले. कार्यक्रमास अंजली वडमारे, सरिता खेमाडे, अर्चना जाधव, आशाबाई भालेराव, क्रांती धनवे, मालन अंकुटे, रमाबाई सोनवणे रंजना चांदणे , सुशीला वक्ते, संस्कार,सुदर्शन चांदणे, सुमेध वक्ते,महामान अभिवाद ग्रुपचे सदस्य व धम्मदीप बुद्ध विहार महिला मंडळाच्या बहुसंख्य महिला, बालक, बालिका यांची उपस्थिती होती. अंजली वडमारे यांच्यातर्फे खीर दान करण्यात आले व शरणातयेणे कार्यक्रमाची सांगता झाली.

---




# ठाकरेंचे आमदार-खासदार पक्ष सोडण्याच्या तयारीत?

उद्धव ठाकरे यांची राजकीय शून्यता व निष्क्रियतेमुळे त्यांचे काही खासदार व आमदार आमच्या संपर्कात असल्याचा दावा शिंदे गटातील नेत्याने केला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या धर्मनिरपेक्षतेवरील वक्तव्यावरून नव्या राजकीय वादाला तोंड फुटले जालना महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत भाजपा-शिंदे गटातील नगरसेवकांमध्ये टोकाचा वाद झाला बारामती विधानसभेच्या पोटनिवडणुकीनंतर काँग्रेसला तोंड दाखवायला जागा राहणार नाही, अशी टीका भाजपा नेत्याने केली काँग्रेसला बदनाम करण्याचा प्रयत्न झाल्यास सर्व सत्य समोर आणून पर्दाफाश करेन, असा थेट इशारा नाना पटोले यांनी दिला. उद्धव ठाकरे यांची राजकीय शून्यता व निष्क्रियतेमुळे त्यांचे काही खासदार व आमदार आमच्या संपर्कात असल्याचा दावा शिंदे गटाचे नेते संजय निरुपम यांनी नागपूर येथील पत्रकार परिषदेतून केला. ठाकरे गटाचे मुंबईतील दोन-तीन खासदार वगळता इतर सर्व खासदार आणि बहुतांशी आमदार आमच्या संपर्कात असून ते योग्य वेळी ते निर्णय घेतील, असे त्यांनी नमुद केले. उद्धव ठाकरे यांनी २०२० मध्ये भाजपाबरोबरची युती तोडून मुख्यमंत्री होण्यासाठी हिंदुत्वाशी दगा केला. त्यामुळेच एकनाथ शिंदे यांनी उठाव केला. राजकीय पक्षात फूट पडल्यानंतर नेत्यांना जपण्यासाठी पक्षाचे प्रमुख धडपड करतात. उद्धव ठाकरे यांनी तसे प्रयत्न केले नसल्याने एकेक जण त्यांना सोडून जात आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे प्रत्येक निवडणुकीत राज्यभर फिरत असताना उद्धव ठाकरे कुठेच गेले नाही, असेही निरुपम म्हणाले. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या धर्मनिरपेक्षतेवरील वक्तव्यावरून नव्या राजकीय वादाला तोंड फुटले. सेक्युलर म्हणजे सर्वधर्म समभाव असे म्हणत व्यक्ती पूर्णपणे धर्मनिरपेक्ष राहू शकत नाही, असे विधान गडकरी यांनी केले. त्यांनी इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांच्या अंत्यविधींचा दाखला देत धार्मिक विधीला ब्राह्मणांना बोलवण्यात आले होते, असे सांगितले. त्यावर प्रतिक्रिया देताना नाना पटोले यांनी व्यक्तीला कोणत्या धर्मात जगायचे हा त्याचा अधिकार आहे, असे सांगत त्यांनी गडकरी धर्मनिरपेक्षतेचा चुकीचा अर्थ लावत असल्याचा आरोप केला. पटोले यांनी संत ज्ञानेश्वर आणि तुकाराम महाराज यांच्या जीवनातील संघर्षांचा उल्लेख करत तत्कालीन सामाजिक व्यवस्थेवर टीका केली. त्या काळात ब्राह्मण व्यवस्थेमुळे संतांना छळ सहन करावा लागला, असे ते म्हणाले. ही व्यवस्था आजही पूर्णतः संपलेली नसल्याचा दावा करत त्यांनी गडकरींनी पुढाकार घेऊन सामाजिक विषमता दूर करण्यासाठी भूमिका घ्यावी, अशी मागणी केली. या विधानामुळे धार्मिक आणि सामाजिक इतिहासावर नव्याने चर्चा सुरू झाली आहे. आमच्या कोणतेही भांडण नसून सर्व मतभेद दूर झाले आहे, असे स्पष्ट करत शहराचा विकास एकत्र साधण्याची ग्वाही भाजपाचे नेते रावसाहेब दानवे व शिंदेसेनेचे आमदार अर्जुन खोतकर यांनी नुकतीच दिली. त्यांनी मैत्रीचा दाखला देऊन चोवीस तास उलटत नाही तोच जालना महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत शिंदे गटाचे नगरसेवक कमलेश खरे आणि भाजपाचे अक्षय गोरंट्याल यांच्यात चांगलीच खडाजंगी झाली. दोघेही आपापल्या जागेवरून एकमेकांकडे हात करून तावातावाने बोलत होते. यादरम्यान वाद चिघळणार हे लक्षात येताच इतर नगरसेवकांनी धाव घेत दोघांनाही शांत केले. दोन्ही पक्षाचे नगरसेवक एकमेकांकडे धावून आल्याने सभागृहातील वातावरण तापले होते. या वादाची संपूर्ण शहरात जोरदार चर्चा रंगली आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाने रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघांमध्ये पोटनिवडणूक होत आहे. या पोटनिवडणुकीसाठी राष्ट्रवादीकडून उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या अर्ज दाखल करणार असून त्यासाठी महायुतीतील वरिष्ठ नेत्यांनी बारामतीकडे कूच केली आहे. या नेत्यांमध्ये भाजपाचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचाही सहभाग आहे. त्यापूर्वी पुण्यामध्ये माध्यमांशी बोलताना त्यांनी काँग्रेसने संस्कृती आणि संस्कार दाखवून निवडणुकीत उमेदवार देऊ नये अशी भूमिका मांडली. अजित पवार यांचे सर्व पक्षांबरोबर चांगली राजकीय संबंध होते. त्यामुळे बहुतांश पक्षांनी निवडणुकीत उमेदवार न देता सुनेत्रा पवार यांना पाठिंबा दर्शवला आहे. काँग्रेसने बारामतीत आपला उमेदवार देऊ नये. निवडणूक लढवल्यास त्यांना तोंड दाखवायलाही जागा राहणार नाही, असा इशारा बावनकुळे यांनी दिला. काँग्रेसला बदनाम करण्याचा प्रयत्न झाल्यास सर्व सत्य समोर आणून पर्दाफाश करेन, असा अप्रत्यक्ष इशारा काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष तथा आमदार नाना पटोले यांनी दिला. शिवसेनेच्या ठाकरे या मुखपत्रातून होणाऱ्या टीकेवर बोलताना नाना पटोले म्हणाले की, मला यावर भाष्य करायचे नव्हते; पण वारंवार काँग्रेसची बदनामी केली जात आहे. महाविकास आघाडीच्या काळात काँग्रेसचा अध्यक्ष कुणाच्या दबावाखाली होऊ दिला नाही, याचे उत्तर त्यांनी द्यावे. आम्ही सहकाऱ्यांना सोबत घेऊन जाण्याचा प्रयत्न करतो; पण आता पाणी डोक्यावरून जात आहे. याबाबत पक्षश्रेष्ठींची परवानगी घेऊन मी त्या सर्व घडामोडींचा पर्दाफाश करेन. माझ्यावर ती वेळ येऊ देऊ नका, असेही नाना पटोले यांनी म्हटले आहे. महाराष्ट्रात आगामी काळात मोठा राजकीय भूकंप पाहायला मिळेल, असे सूचक विधानही त्यांनी केले आहे.

# पाली बिंदुसरा धरणात पाच तास जलसमाधी आंदोलन

## ऊसतोड कामगारांच्या मागण्यांसाठी पांडुरंग आंधळे यांचे उपोषण १४ व्या दिवशी; प्रशासन अद्याप उदासीन

**बीड । प्रतिनिधी**

ऊसतोड कामगारांचे प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी ऊसतोड कामगार श्री. पांडुरंग वामनराव आंधळे हे जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे मागील १४ दिवसांपासून आमरण उपोषण करत आहेत. मात्र, प्रशासनाकडून अद्याप कोणतीही ठोस दखल घेतली जात नसल्याने कामगारांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. सरकारच्या उदासीन धोरणाचा निषेध म्हणून व ऊसतोड कामगार श्री पांडुरंग वामनराव आंधळे यांना पाठिंबा देण्यासाठी श्री.बाळासाहेब मोरे पाटील (संस्थापक अध्यक्ष, शिव शाहू ऊसतोड कामगार संघटना) यांच्या नेतृत्वाखाली पाली येथील बिंदुसरा प्रकल्पात तब्बल पाच तास जलसमाधी आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाद्वारे शासनाचे लक्ष वेधण्याचा




प्रयत्न करण्यात आला.

ऊस तोडणी व भरणी दर ५०० प्रति टन करण्यात यावा व वाहतूक दरात दुप्पट वाढ करावी. ऊसतोड भरणी व वाहतुकीचा करार दरवर्षी करण्यात यावा. ऊस तोडणीदरम्यान प्रसूती झाल्यास माता भगिनींना २५,००० प्रसूती भत्ता देण्यात यावा. ऊसतोड कामगारांची अधिकृत नोंदणी करून त्यांना ओळखपत्र देण्यात यावे. तत्कालीन मुख्यमंत्री माननीय देवेंद्र फडणवीस यांनी २०१४-१५ गळीत हंगामासाठी जाहीर केलेली २०% दरवाढ तात्काळ लागू करावी. या जलसमाधी आंदोलनादरम्यान मंडळ अधिकारी शितलताई चाटे या उपस्थित होत्या व त्यांनी आंदोलनकर्त्यांचे निवेदन स्वीकारले. मात्र, बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके हे प्रत्यक्ष उपस्थित नसल्यामुळे आंदोलनकर्त्यांमध्ये काही काळ असंतोष निर्माण झाला.

यानंतर माजी सैनिक अशोक येडे (जिल्हाध्यक्ष, आम आदमी पार्टी बीड) यांच्या मध्यस्थीने तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्याशी दूरध्वनीवर चर्चा करण्यात आली. तहसीलदारांनी प्रतिनिधी मंडळासह उपोषणकर्ते पांडुरंग आंधळे यांची जिल्हाधिकारी यांच्यासोबत बैठक घेऊन तोडगा काढण्याचे आश्वासन दिले. या आश्वासनानंतर जलसमाधी आंदोलन तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्यात आले असून, कामगारांच्या न्याय्य मागण्या पूर्ण होईपर्यंत लढा सुरूच राहणार असल्याचा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला आहे.

या आंदोलनात बाळासाहेब मोरे पाटील, माजी सैनिक अशोक येडे, जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी सामाजिक कार्यकर्त्या किस्किंदाताई पांचाळ (विश्व कल्याण महिला सेवाभावी संस्था), सीताबाई भोसले (महिला जिल्हाध्यक्ष, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया), प्रदीप बांगर, बाळसिंह परदेशी, केशव तांदळे, रेवन येडे, माऊली शिरसाट, सतीश (भाऊ) जोगदंड, ज्ञानेश्वर तांदळे, आयुब पठाण, मोहन आघाव, संभाजी कदम, रोशन केकान, अरुण साठे कर्जणीकर, अमोल चौरे, महादेव नाईकवाडे, संपत नागरगोजे, अमोल सावंत, अविनाश मुंडे, बाळासाहेब कळसकर आदींची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

# बीडकर नागरिक दूषित पाणी पिण्यास मजबूर ८-१० दिवसांतून एकदाच पाणीपुरवठा, आरोग्य धोक्यात : कझी मुहीबूर रहमान

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील नागरिकांना सध्या पाणीटंचाईसोबतच दूषित पाण्याच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. शहरात ८ ते १० दिवसांतून एकदाच पाणीपुरवठा होत असून, त्यानंतर मिळणारे पाणी अत्यंत घाणेरडे व दूषित असल्याची





तक्रार नागरिकांकडून होत आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, नळातून येणाऱ्या पाण्याला दुर्गंधी येत असून त्याचा रंगही बदललेला असतो. हे पाणी पिण्यायोग्य नसतानाही लोकांना पर्याय नसल्यामुळे तेच पाणी वापरावे लागत आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. स्थानिक नागरिकांनी सांगितले की, आम्हाला ८-१० दिवसांनी पाणी मिळते, पण तेही इतके घाण असते की ते पिणे धोकादायक आहे. लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांच्या तब्येतीवर याचा परिणाम होऊ शकतो.

या गंभीर समस्येकडे नगरपालिका प्रशासनाने तात्काळ लक्ष देण्याची गरज आहे. स्वच्छ आणि नियमित पाणीपुरवठा करण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे. अन्यथा येत्या काळात आरोग्यविषयक मोठा प्रश्न निर्माण होऊ शकतो. नागरिकांनी प्रशासनाला इशारा दिला आहे की, जर लवकरात लवकर उपाययोजना करण्यात आल्या नाहीत, तर तीव्र आंदोलन छेडले जाईल.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अनोखे अभिवादन : १२ तास अभ्यास अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**परळी । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त भीमनगर, जगतकर गल्ली, प्रबुद्ध नगर येथे भीम उत्सवाला उत्साहात प्रारंभ झाला आहे. सुगंध कुट्टी परळी येथे विविध, शैक्षणिक, सामाजिक व स्पर्धा, प्रेरणादायी कार्यक्रमांच्या माध्यमातून जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जात आहे. बाबासाहेबांच्या शिका, संघटित व्हा, संघर्ष करा या विचारांपासून प्रेरणा घेत सलग १२ तास अभ्यास अभियान या अनोख्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. विशेष म्हणजे, हा उपक्रम गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने राबवला जात असून, यंदाही



विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद लाभला. या अभियानात परिसरातील सुमारे ११० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून शिक्षणाप्रती आपली बांधिलकी दर्शवली.

या प्रसंगी शहरातील यशस्वी मेकॅनिकल इंजिनियर व सध्या युनायटेड किंगडम (आयर्लंड) येथे मेट्रो रेल्वे विभागात डेप्युटी डायरेक्टर म्हणून कार्यरत असलेले इंजि. राजू जगतकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या भाषणात जिद्द, चिकाटी आणि सातत्य या गुणांचे महत्त्व अधोरेखित करत, या गुणांच्या बळावर कोणतेही यश प्राप्त करता येते, असे सांगितले. त्यांनी विद्यार्थ्यांना अनेक प्रेरणादायी उदाहरणे देत शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. तसेच, शिक्षणामुळेच आपल्या आयुष्यात सकारात्मक बदल घडतो, त्यामुळे विद्यार्थ्यांसोबत पालकांनीही त्यांच्या शैक्षणिक प्रगतीकडे लक्ष देणे आवश्यक आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दि. ५ एप्रिल २०२६ रोजी माता रमाई आंबेडकर सभागृह येथे या उपक्रमाचे उद्घाटन पार पडले. या वेळी इंजि. राजू जगतकर, बीके कलर होमचे संचालक तसेच विनोदी कांबळे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाला बालाजी जगतकर, अभिजीत कांबळे, आनंद जगतकर, संजय जगतकर, अमोल अवचारे, सिद्धार्थ जगतकर आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमादरम्यान जयंती उत्सव समितीचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी समितीचे अध्यक्ष आकाश साळवे यांनी उपस्थित मान्यवर, विद्यार्थी व नागरिकांचे आभार मानले.

# सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे मावलाई राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित

**बीड । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील ब-हाणपुर येथील मावलाई युवक क्रीडा मंडळ व



व्यायाम शाळेच्या वतीने पत्रकारिता, क्रीडा व सामाजिक क्षेत्रात विशेष योगदान देणाऱ्या मान्यवरांना दरवर्षी मावलाई राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. दि.०३ रोजी मावलाई देवी यात्रेनिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात लिंबागणेश येथील सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांना सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. डॉ. ढवळे यांनी जिल्ह्यातील विविध जनतेच्या प्रश्नांवर लोकशाही मार्गाने आंदोलने करत आवाज उठवून अनेक प्रश्न मार्गी लावले आहेत. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात भागवत वराट यांनी सांगितले की, गेल्या १९ वर्षांपासून अध्यात्म, सामाजिक आणि क्रीडा क्षेत्रात योगदान देणाऱ्या व्यक्तींना या पुरस्काराच्या माध्यमातून सन्मानित करण्यात येत आहे. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रमोद कुलकर्णी यांनी केले.

या वेळी मान्यवरांच्या हस्ते डॉ. गणेश ढवळे यांच्यासह शेतीनिष्ठ शेतकरी कल्याण कुलकर्णी, प्रमोद कुलकर्णी, अतुल कुलकर्णी, विकास उमापुरकर, दिनेश लिंबेकर आणि सुशील कुलकर्णी यांना शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमास शेख युनुस, धनंजय बजगुडे, गणेश शेंडगे, कुमार देशमुख, संतोष कदम यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. मावलाई राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित झाल्याबद्दल डॉ. गणेश ढवळे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# पात्रुड येथील माळी गल्ली हनुमान चौकात हनुमान जन्मोत्सवाचे आयोजन

## पंचक्रोशीतील भजनी मंडळ व भाविकांना उपस्थितीचे आवाहन

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील पात्रुड येथील माळी गल्ली, हनुमान चौक येथे हनुमान जन्मोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, या निमित्ताने रात्रभर भजनाचा जागर आणि भव्य अन्नदान सोहळा संपन्न होणार आहे. या मंगलमयी सोहळ्यासाठी गावातील सर्व भजनी मंडळ आणि हनुमान भक्तांना उपस्थित राहण्याचे कळकळीचे आवाहन करण्यात आले आहे.



**भागवत भुजबळ यांच्या नेतृत्वात भजनाचा जागर**

कार्यक्रमाची सुरुवात १ एप्रिल रोजी रात्रीपासून होणार असून, या भजनाचे नेतृत्व प्रसिद्ध भजनी भागवत भुजबळ करणार आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली रात्रभर भक्तीमय वातावरणात गावातील सर्व भजनी मंडळाच्या वतीने विठ्ठल-नामाचा गजर आणि हनुमान चालीसाचे पठण केले जाईल. २ एप्रिल रोजी पहाटे ५ वाजल्यापासून प्रत्यक्ष हनुमान जन्माच्या वेळेपर्यंत अखंड भजन सुरू राहणार आहे. या भक्ती सोहळ्यात गावातील सर्व भजनी मंडळांनी आपल्या टाळ-मृदंगाच्या गजरात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.हनुमान जन्माचा सोहळा संपन्न झाल्यानंतर सकाळी सर्व भाविकांसाठी अंजली किराणा व जनरल स्टोअर्स यांच्या सौजन्याने भव्य 'अन्नदान' (महाप्रसाद) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

माळी गल्ली हनुमान चौक मित्र मंडळाच्या वतीने या सोहळ्याचे नेटके नियोजन करण्यात आले आहे. पात्रुड परिसरातील सर्व हनुमान भक्तांनी आणि ग्रामस्थांनी या भक्ती सोहळ्याचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या कार्यक्रमामुळे संपूर्ण माळी गल्ली आणि हनुमान चौक परिसरात सध्या उत्साहाचे आणि भक्तीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्तीची यशोधरा विहार येथे उत्साहात प्रतिष्ठापना

## का.भिकाजीराव वाघमारे यांच्या स्मरणात संकल्पपूर्ती सोहळा संपन्न

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरातील फुलेनगर, माजलगाव येथील यशोधरा बुद्धविहार येथे विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य मूर्तीची प्रतिष्ठापना मान्यवरांच्या उपस्थितीत अत्यंत उत्साहात संपन्न झाली. कालकथित राधाबाई भिकाजीराव वाघमारे आणि कालकथित भिकाजीराव किसन वाघमारे (माजी जि.प. सदस्य, बीड) यांच्या पावन स्मृतीनिमित्त 'भीम प्रतीरूपाचे दान' या संकल्पपूर्तीतून हा ऐतिहासिक सोहळा पार पडला.



या सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रकाश सोळंके उपस्थित होते, तर कार्यक्रमाचे अध्यक्षपद बाबुराव पोटभरे यांनी भूषविले. यावेळी प्रकाश कांबळे, माजी जि.प. सदस्य डॉ.श्रीराम खळगे, के.व्ही. साळवे, धम्मानंद साळवे, विजय साळवे, कचरू खळगे, डॉ.अशोक तिडके, अंकुश जाधव, नगरसेवक अशोक लांडगे, सदानंद प्रधान, सचिन जावळे, सय्यद नूर, विजय शिंदे, प्रशांत शेटे, मेहमूद कुरेशी, राकेश साळवे, सदाशिव भालेराव, नवनाथ धाईजे, भीमराव टाकणखार, अमोलरत्न डोंगरे, भास्कर घाडगे यांच्यासह अनेक उपासक-उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कार्यक्रमादरम्यान आमदार प्रकाश सोळंके, बाबुराव पोटभरे, विजय साळवे, सदाशिव भालेराव, अमोलरत्न डोंगरे आणि के. व्ही. साळवे यांनी आपली मनोगते व्यक्त केली. पू.भदंत धम्मशील थेरो व पू.भदंत पिंडोल यांनी धम्मदेशना देत वाघमारे परिवाराच्या या दातृत्वाचे आणि उपक्रमाचे विशेष कौतुक केले. बाबुराव पोटभरे आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, या बुद्धविहाराचे अपूर्ण राहिलेले काम येत्या विजयादशमी पर्यंत व बुद्धविहाराकडे येणारा रस्ता एका महिन्यात आम्ही पूर्ण करू. बुद्धाने सांगितलेल्या मार्गावर सर्व उपासक-उपासिकांनी आचरण करणे हीच खरी मानवंदना ठरेल.

यावेळी मार्गदर्शन करताना धम्मशील महाथेरो म्हणाले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला बुद्ध धम्माचा मार्ग दाखवला. निसंकोच मनाने केलेले दान हेच खरे दान असते, जे जीवनभर सुख देऊ शकते. केवळ नावासाठी केलेले दान समाधान देऊ शकत नाही. डॉ.आंबेडकर हे बुद्ध धम्म वाहिनी आहेत. त्यांच्या विचारांचे आचरण करणे आजच्या काळात गरजेचे आहे. त्यांनी पुढे नमूद केले की, बुद्धावर बोलणे सोपे आहे, परंतु त्यांचे विचार कृतीत आणणे कठीण आहे. आंबेडकरवादी चळवळीचा उपयोग स्वतःच्या स्वार्थासाठी न करता, ती जिवंत ठेवणे आणि बुद्धविहाराचे पावित्र्य जपणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. या कार्यक्रमामुळे फुलेनगर व परिसरात उत्साहाचे आणि धम्ममय वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वाघमारे यांच्या सर्व मुलींनी, त्यांच्या परिवारातील सदस्यांनी तसेच यशोधरा बुद्धविहाराचे सचिव बाबासाहेब जाधव सर व सर्व ट्रस्ट सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.

# द रीयल पँथर प्रेम कांबळे यांची दलित पँथर बीड युवक जिल्हाध्यक्षपदी निवड



**बीड । प्रतिनिधी**

दलित पँथर या लढाऊ व सामाजिक चळवळीच्या संघटनेत संघटनात्मक बांधणीला बळकटी देण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. राष्ट्रीय अध्यक्ष स्वप्नील दादा ढसाळ यांच्या आदेशानुसार तसेच बीड जिल्हाध्यक्ष धम्मानंद वाघमारे यांच्या नेतृत्वाखाली प्रेम (भाई) कांबळे यांची बीड युवक जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. प्रेम कांबळे हे सामाजिक क्षेत्रात सक्रिय कार्यकर्ते असून त्यांनी विविध प्रश्नांवर आक्रमक भूमिका घेत समाजातील वंचित, शोषित घटकांसाठी सातत्याने आवाज उठवला आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांच्यावर ही जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

या नियुक्तीमुळे बीड जिल्ह्यात दलित पँथर संघटनेला अधिक बळ मिळणार असून युवकांमध्ये नवचैतन्य निर्माण होईल, असा विश्वास संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. तसेच, अन्यायाविरोधात लढा देत समाजहिताच्या प्रश्नांवर तीव्रपणे काम करण्याची भूमिका संघटनेने स्पष्ट केली आहे. नियुक्तीनंतर प्रेम कांबळे यांनी संघटनेच्या विश्वासाबद्दल आभार व्यक्त करत, दलित पँथरच्या विचारांशी प्रामाणिक राहून अन्यायग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी आणि युवकांना संघटित करण्यासाठी मी कटिबद्ध आहे, असे सांगितले. या निवडीबद्दल विविध सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी प्रेम कांबळे यांचे अभिनंदन केले असून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# घागर बस स्थानकाखाली लावा, पाणी गळायला लागलं : शेख युनूस

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील जुने बस स्थानक तोडून त्या जागी १३ कोटी खर्चून नवीन बस स्थानक उभे करण्यात आले. पण त्याचे एकाच पावसाच्या पाण्यात तीन तेरा वाजले,



असेच म्हणावे लागेल. जिल्ह्याची शान म्हणजे बस स्थानक असते. सर्वात प्रथम माणूस त्याकडे पाहतो. पण नवीन बस स्थानक याच्याकडे पाहून असं वाटतं की जुने बस स्थानकच बरे होते, असेच मनावे लागेल. कारण नवीन बस स्थानक बांधून काहीच उपयोग झालेले दिसत नाही. कारण अंगण सांगतो घराची कळा त्याचप्रमाणे बस स्थानक सांगता आहे शहराची कळा असं म्हणायला काही हरकत नाही. कारण १३ कोटी खर्चून जर ही परिस्थिती आता आहे तर पावसाळ्यात अजून पुढे कसे होईल. हा प्रश्न जनतेच्या मनात पडले आहे. आणि म्हणूनच जिल्हा अधिकारी साहेब सिग्नल कोसळतात गुत्तेदारावर गुन्हा दाखल झाला. त्याचप्रमाणे बस स्थानक उभारलेल्या भ्रष्ट ठेकदारावर गुन्हा दाखल करा. हीच मागणी जनता आपल्याकडे करीत आहे.

# आम्रपाली साबळे यांची मराठवाडा उपाध्यक्षा महिला विभाग पदी निवड

**बीड । प्रतिनिधी**

अन्याय अत्याचार भ्रष्टाचार विरोधी समिती महाराष्ट्र राज्य, या संघटनेची



बैठक दि.०२/०४/२०२६ संपन्न झाली. यावेळी अन्याय अत्याचार भ्रष्टाचार विरोधी समिती महाराष्ट्र राज्य चे संस्थापक अध्यक्ष सौदागर महमदरफी यांच्या आदेशाने महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष माधव मारकवाड यांनी निवड करुण त्यांना तसे नियुक्तीपत्र दिले.

महाराष्ट्रात माहिती अधिकार, मानवीहक्क, पत्रकार संरक्षण, भ्रष्टाचार निर्मुलन, ग्राहक संरक्षण, कायद्याचा प्रचार, प्रसार करण्यात येणार आहे, त्याच प्रमाणे नागरिकांना व शासकीय घटकांना माहिती अधिकाराचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. पत्रकार व माहिती अधीकार कार्यकर्त्यांवर होणारे खोटे गुन्हे व हल्ले या बाबत संघटितपणे लोकशाही व सनदशीर मार्गाने लढा दिला जाऊन कार्यकर्त्यांचे संगठन तयार करून भ्रष्ट नोकरशाही चा माहिती अधिकार कायद्याचा वापर करून पर्दाफाश करणार आहे. सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतीक, वैद्यकिय क्षेत्रात, सरकारी कामात भ्रष्टाचार होत असल्यास त्या विरुध्द तक्रार देऊन उपोषण, अंदोलन करू अशी माहीती संस्थापक अध्यक्ष सौदागर महमद रफी यांनी दिली. या निवडी बद्दल यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# जिल्हास्तरीय सामान्य ज्ञान स्पर्धेची तालुकास्तरीय परीक्षा संपन्न

## विद्यार्थ्यांनी प्रचंड संख्येने नोंदविला सहभाग; भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे उत्कृष्ट नियोजन!

**बीड । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त दर सालाबादप्रमाणे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती महोत्सव समिती बीड शहर च्या वतीने यावर्षीही महापुरुषांच्या जीवन कार्यावर जिल्हास्तरीय सामान्य ज्ञान स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेच्या तालुकास्तरीय परीक्षा दिनांक ३० मार्च २०२६ सोमवार रोजी सर्व तालुक्यात संपन्न झाली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती च्या वतीने तालुका बीड साठी दिलेल्या परीक्षा केंद्र तुलसी संगणक महाविद्यालय येथे समितीचे आयु.मनोज वाघमारे सर, आयु.सुमेध जोगदंड सर, अशोक ठोकळ, तानाजी शिनगारे,अभिजीत जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये उद्घाटन समारंभ संपन्न



झाला. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा. प्रकाश ढोकणे सर यांनी केले. तसेच जिल्हाभरातून या परीक्षेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. देशाला आदर्श घालून दिलेल्या बीड जय भीम महोत्सवात महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती व चिकित्सक अभ्यास वृत्ती विकसित करण्यासाठी या परीक्षेच्या मागचा उद्देश आहे. जिल्हाभरातून एकूण हजार विद्यार्थी परीक्षेत सहभागी झाले होते. स्पर्धा यशस्वी पार पाडण्यासाठी महापुरुष सामान्य ज्ञान जिल्हा स्पर्धा प्रमुख प्रा. शशिकांत जावळे, आयु. प्रणित सरवदे सर, आयु. सुमेध जोगदंड सर, प्राचार्य प्रदीप गाडे, आयु. भारत मगर, आयु. प्रवीण तरकसे सर, ड .राजेश शिंदे, आयु. महादेव इनकर सर, प्रा.अशोक गायकवाड यांनी उत्कृष्ट असे नियोजन केले.

तसेच तालुका समन्वयक समिती तयार करून त्याद्वारे स्पर्धा परीक्षा यशस्वीरित्या संपन्न केली.यामध्ये प्रामुख्याने शिरूर तालुका समन्वयक श्रीमती अनिता लाटे मॅडम व जयेंद्र निकम सर, आष्टी तालुका समन्वयक प्राचार्य रत्नकांत निकाळजे व डॉ.चंद्रकांत साळवे, पाटोदा तालुका समन्वयक प्राचार्य श्रीमती अस्मिता जावळे मॅडम व आयु. जावळे पृथ्वीराज सर , वडवणी तालुका समन्वयक आयु. बाबा जाधव वआयु.दीपक वडमारे सर, तालुका धारूर समन्वयक आयु. रुद्र सर व सिरसाठ सर,परळी तालुका समन्वयक आयु. गायकवाड सर केज तालुका समन्वय दादा गायकवाड सर, माजलगाव तालुका समन्वयक आयु. प्रमोद साळवे सर व अमोल राऊत सर ,गेवराई तालुका समन्वयक आयु.भारत मगर सर व सदाफुले सर व बीड समन्वयक प्रा. प्रकाश ढोकणे यांनी सुंदर नियोजन करून परीक्षा संपन्न केल्या. तालुक्यातील टॉप टेन विद्यार्थ्यांसाठी जिल्हास्तरीय परीक्षा दिनांक पाच एप्रिल २०२६ रोजी तुलसी संगणक महाविद्यालय बीड येथे आयोजन करण्यात आले आहे यासाठी पात्रधारक सर्व विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी उपस्थित रहावे असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# पत्रकारांचा आवाज दाबण्यासाठी बीडमध्ये 'कलमांचा' खेळ?

## हद्द शिवाजी नगरची, मग 'ग्रामीण'मध्ये गुन्हा का? पोलिसांच्या कार्यपद्धतीत मोठे 'गौडबंगाल'!

**बीड । विश्वनायक न्यूज**
जाहिरात मागणे म्हणजे खंडणी वसूल करणे नव्हे, हा कायद्याचा प्राथमिक नियम पायदळी तुडवून बीडमध्ये दोन दैनिकांच्या संपादकांवर खंडणीचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या प्रकरणातील तांत्रिक बाबी आणि पोलिसांची 'अतिघाई' पाहता, हा गुन्हा कायद्याला धरून आहे की कोणा राजकीय नेत्याच्या दबावाखाली पत्रकारांची मुस्कटदाबी करण्यासाठी रचलेला 'कलमांचा खेळ' आहे? असा संतप्त सवाल आता विचारला जात आहे.

### जाहिरात मागणे म्हणजे खंडणी नव्हे! बीड पोलिसांना कायद्याचा विसर की 'वरचा' दबाव?
### पत्रकारांनो आता तरी जागे व्हा! आज त्यांच्यावर, उद्या तुमच्यावर; चुकीच्या पायंड्याविरुद्ध एल्गार पुकारा!

दोन दैनिकांच्या संपादकांवर चक्क खंडणीचे गुन्हे दाखल करून बीडमध्ये एक नवा आणि चुकीचा पायंडा पाडला जात आहे. कायद्याच्या जाणकारांच्या मते, हा प्रकार जास्तीत जास्त 'ब्लॅकमेलिंग'च्या कक्षेत येऊ शकतो, मात्र थेट खंडणीचे कलम लावण्यामागे नक्की काय 'गौडबंगाल' आहे, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.मिळालेल्या माहितीनुसार, पाली परिसरातील 'हिलटॉप रिसॉर्ट'चे चालक अक्षय किशोर वीर यांनी बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. या तक्रारीनुसार, व्हॉटस्प ग्रुपवर हॉटेलसंदर्भात मेसेज टाकल्याच्या कारणावरून चर्चा करण्यासाठी हॉटेल चालक आणि संपादक दीपक थोरात व मिलिंद आदमाने यांची भेट झाली. यावेळी संपादकांनी आमच्या पेपरला जाहिरात देत जा, नाहीतर बदनामीकारक बातम्या छापणार असे म्हटल्याचा आरोप तक्रारदाराने केला आहे. तडजोडीनंतर ५ हजार रुपये ऑनलाईन पाठवल्याचे आणि उर्वरित रकमेची मागणी केल्याचे तक्रारीत नमूद आहे.या संपूर्ण प्रकरणात सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, तक्रारदाराने नमूद केलेले 'घटनास्थळ' आणि 'व्हिडिओ रेकॉर्डिंग' हे नगर नाका आणि जिल्हा रुग्णालयासमोर म्हणजेच शिवाजी नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आहे. असे असतानाही गुन्हा नोंदवण्यासाठी बीड ग्रामीण पोलीस ठाण्याचा घाट का घातला गेला? हद्दीचा हा खेळ कोणाच्या सांगण्यावरून खेळला जात आहे? यावरून पोलिसांच्या कार्यपद्धतीवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.कायद्यानुसार खंडणीचा गुन्हा सिद्ध होण्यासाठी ज्या तांत्रिक बाबी लागतात, त्या या तक्रारीत कुठेही ठोसपणे दिसत नाहीत. जाहिरात मागणे हा व्यावसायिक भाग असू शकतो. एखाद्या गुन्ह्यात तांत्रिक बाबींचा आधार घेऊन पत्रकारांची कोंडी करणे हे अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणण्यासारखे आहे. एफआयआरचे अवलोकन केले असता, हा केवळ दबावाचा प्रकार वाटत असल्याचे कायदेतज्ज्ञांचे म्हणणे आहे.

#### पूर्वनियोजित कट की व्यावसायिक वाद?

तक्रारदाराने आधीच व्हिडिओ बनवणे, व्हॉईस रेकॉर्डिंग करणे आणि लगेच पोलीस ठाणे गाठणे हे सर्व पाहता हा संपादकांना जाळ्यात ओढण्याचा पूर्वनियोजित कट तर नाही ना? अशी शंका उपस्थित होत आहे. जाहिरात देताना रितसर ऑर्डर किंवा पावती मागणे हा संपादकांचा अधिकार आहे, पण त्याला गुन्हेगारी स्वरूप देऊन पत्रकारांच्या प्रतिमेला काळिमा फासण्याचे काम बीडमध्ये सुरू झाले आहे.

#### हद्दीचा खेळ आणि 'गौडबंगाल'

या प्रकरणातील सर्वात संशयास्पद बाब म्हणजे 'गुन्हा नोंदवण्याचे ठिकाण'. तक्रारदाराने दिलेल्या माहितीनुसार, कथित घटना नगर नाका आणि जिल्हा रुग्णालयासमोर घडली असून त्याचे व्हिडिओ चित्रीकरणही तिथेच झाले आहे. हे कार्यक्षेत्र शिवाजी नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत येते. असे असतानाही हा गुन्हा बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात का दाखल करण्यात आला? हद्दीची ही तांत्रिक बाब डावलून ग्रामीण पोलिसांनी दाखवलेली ही तत्परता खूप काही सांगून जाते. या हद्दीच्या बदलामागे नक्की काय 'गौडबंगाल' दडलेले आहे, याचा तपास होणे गरजेचे आहे.

#### पत्रकारांनो, आता तरी जागे व्हा!

आज जर जाहिरात मागण्याच्या कारणावरून संपादकांवर खंडणीचे गुन्हे दाखल होत असतील, तर उद्या कोणतीही बातमी छापण्यापूर्वी पत्रकारांना पोलिसांच्या आणि प्रशासनाच्या दहशतीखाली राहावे लागेल. जाहिरात घेताना रितसर ऑर्डर किंवा पावती दिली जाते, हा व्यावसायिक शिरस्ता आहे. मात्र, याला गुन्हेगारीचे स्वरूप देऊन पत्रकारांची प्रतिमा मलिन करण्याचा हा प्रयत्न आहे. या चुकीच्या पायंड्याविरुद्ध सुज्ञ पत्रकारांनी एकवटून आवाज उठवणे आता काळाची गरज बनली आहे.

---

# माजलगावमध्ये दारूवर पोलिसांची धडक कारवाई; आरोपी ताब्यात

**माजलगाव । प्रतिनिधी**



माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध हातभट्टी दारू निर्मिती व विक्रीविरोधात पोलिसांनी मोठी कारवाई करत एकाला अटक केली आहे. ही कारवाई गुरुवारी (दि. ०२ एप्रिल २०२६) गुप्त माहितीच्या आधारे सन्नाथडी परिसरात करण्यात आली. माहितीनुसार, मा. उपविभागीय अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पोलीस निरीक्षक यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथकाने संबंधित ठिकाणी छापा टाकला.

यावेळी भिमराव तुकाराम मेंढके (रा. सोयगाव रोड, माजलगाव) हा आपल्या राहत्या घरामागील मोकळ्या जागेत बेकायदेशीररीत्या हातभट्टी दारू तयार करताना आढळून आला. छाप्यामध्ये पोलिसांनी सुमारे ७,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. यात ३० लिटर क्षमतेच्या कॅनमध्ये सुमारे २५ लिटर तयार हातभट्टी दारू, २०० लिटर क्षमतेच्या ड्रममध्ये सुमारे १५० लिटर कच्चा रासायनिक माल तसेच इतर साहित्याचा समावेश आहे. या प्रकरणी आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये कलम ६५ (फ) व (ई) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास माजलगाव ग्रामीण पोलीस ठाणे करीत आहे. या कारवाईत पोलीस अधिकारी व अंमलदारांचा सक्रिय सहभाग होता. परिसरातील अवैध व्यवसायांवर पोलिसांची अशीच कठोर कारवाई पुढेही सुरू राहणार असल्याचे पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

---

### ३५३ चा गुन्हा दाखल करण्याची धमकी; अंबेवेस पुलाच्या शुभारंभावरून नगरसेवक नितीन बागवाले आक्रमक

# नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी प्रथम पर्यायी पूल उभारावा

**परळी वै. । प्रतिनिधी**



अंबेवेस परिसरातील जुन्या पुलाच्या पुनर्निर्माणासाठी आज शुभारंभ करण्यात आला असला, तरी या कामाच्या पद्धतीवर नगर परिषदेत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे गटनेते तथा नगरसेवक नितीन बागवाले यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेचा विचार न करता घाईघाईत शुभारंभ करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे. अंबेवेस येथील पूल हा प्रभाग क्रमांक १६ मधील अत्यंत महत्त्वाचा वाहतूक दुवा असून, या भागातील नागरिकांना दररोज ये-जा करण्यासाठी याच पुलाचा आधार आहे. त्यामुळे जुना पूल पाडण्यापूर्वी नागरिकांसाठी पर्यायी पुलाची व्यवस्था करणे अत्यावश्यक असल्याचे बागवाले यांनी स्पष्ट केले.

नगर परिषदेच्या मंजूर इस्टीमेटमध्येच सुमारे ९ लाख रुपयांची तरतूद पर्यायी पुलासाठी करण्यात आलेली असताना, सत्ताधाऱ्यांनी त्या कामाकडे दुर्लक्ष करून थेट मुख्य पुलाच्या बांधकामाचा शुभारंभ करणे हे निष्काळजीपणाचे व नागरिकांच्या अडचणींकडे दुर्लक्ष करणारे असल्याची टीका त्यांनी केली. पावसाळ्यात हा प्रश्न अधिक गंभीर होऊ शकतो. शालेय विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक व शेतकरी यांना मोठा त्रास सहन करावा लागू शकतो. त्यामुळे पर्यायी पूल उभारल्याशिवाय मुख्य काम सुरू करणे योग्य नाही, असे ठाम मत नितीन बागवाले यांनी व्यक्त केले. तसेच, नागरिकांच्या सोयी-सुविधा आणि सुरक्षितता हाच विकासाचा खरा पाया असून, केवळ औपचारिक शुभारंभ करून जनतेच्या अडचणींकडे दुर्लक्ष करणे निंदनीय असल्याचेही त्यांनी नमूद केले. दरम्यान, अंबेवेस परिसरातील नागरिकांनीही नितीन बागवाले यांच्या मागणीला समर्थन दर्शवले असून, लवकरात लवकर पर्यायी पूल उभारण्यात यावा, अशी जोरदार मागणी पुढे येत आहे.

**लोकप्रतिनिधीचा आवाज दडपण्याचा प्रयत्न : नगरसेवक नितीन बागवाले**

अंबेवेस परिसरातील जुन्या पुलाच्या पुनर्निर्माणासाठी शुभारंभ करण्यात आला ही चांगली बाब आहे. मात्र, नगरपरिषदेच्या इस्टिमेटमध्ये प्रभाग क्रमांक १६ मधील नागरिकांच्या सोयीसाठी पर्यायी पुलासाठी ९ लाख रुपयांची तरतूद असतानाही त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. याबाबत मी आवाज उठवला असता सत्ताधारी पक्षाच्या वतीने माझ्यावर ३५३ चा गुन्हा दाखल करण्याची धमकी विद्यमान नगराध्यक्षांच्या पतीकडून देण्यात आली. लोकप्रतिनिधीला अशा प्रकारे दडपण्याचा प्रयत्न होणे निंदनीय असून, हा प्रकार लोकशाहीस घातक आहे.

---

### माजलगाव तालुक्यातील ५६१० शेतकऱ्यांना दिलासा

# ३ कोटींपेक्षा अधिक रक्कम खात्यात जमा : नुमान चाऊस

**माजलगाव । प्रतिनिधी**



तालुक्यातील शेतकरी राशन कार्ड धारकांचा दीर्घकाळ प्रलंबित असलेला प्रश्न अखेर मार्गी लागला असून, रखडलेली रक्कम संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आली आहे. या निर्णयामुळे हजारो शेतकरी बांधवांना मोठा दिलासा मिळाला आहे. या प्रकरणात एकूण ५६१० लाभार्थ्यांना लाभ मिळाला असून, एकूण ३,०९,५४,९६० (तीन कोटी नऊ लाख चौपन्न हजार नऊशे साठ रुपये) इतकी रक्कम वितरित करण्यात आली आहे.

या यशामध्ये आमदार प्रकाश दादा सोळंके व जयसिंग भैय्या सोळंके यांच्या ठाम भूमिकेचा मोठा वाटा आहे. तसेच मौलाना आझाद युवा मंच यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा महत्त्वपूर्ण निर्णय शक्य झाला असल्याचे सांगण्यात येत आहे. यासंदर्भात जिल्हाध्यक्ष नुमान अली चाऊस यांनी सांगितले की, ही फक्त सुरुवात असून, पुढील काळातही जनतेच्या हक्कासाठी आमचा लढा कायम सुरू राहील. या यशस्वी प्रयत्नासाठी सर्व सहकारी व संबंधित अधिकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले आहेत.

---

# महापुरुषांच्या अनाधिकृत स्मारकांविरोधात कारवाईसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन : डॉ. ढवळे

**बीड । प्रतिनिधी**



राज्यात महापुरुषांच्या नावाखाली अनाधिकृत पुतळे व स्मारके उभारण्याचे प्रकार वाढत असून, त्यामुळे सामाजिक सलोखा बिघडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्याची गंभीर बाब समोर येत आहे. या पार्श्वभूमीवर दोषींवर कठोर कारवाई करावी आणि शासनाच्या पुतळा धोरणाची काटेकोर अंमलबजावणी करावी, या प्रमुख मागण्यांसाठी आज जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले.

हे आंदोलन सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली पार पडले. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री तथा गृहमंत्री, पोलीस महासंचालक आणि विशेष पोलीस महानिरीक्षक (संभाजीनगर परिक्षेत्र) यांना निवेदन देण्यात आले. या आंदोलनात माहिती अधिकार कार्यकर्ते शेख युनुस चऱ्हाटकर, मुबीन शेख, शिवशक्ती-भीमशक्ती विचारमंचाचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे, माजी सैनिक अशोक येडे (जिल्हाध्यक्ष, आम आदमी पार्टी बीड) रामधन जमाले (जिल्हाध्यक्ष, इंटक बीड), किष्किंधा पांचाळ (अध्यक्ष, विश्व कल्याण महिला सेवा भावी संस्था, बीड), सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे, भिमराव कुटे आदी उपस्थित होते.

राज्यात अनेक ठिकाणी स्थानिक प्रशासनाची परवानगी न घेता रातोरात महापुरुषांचे पुतळे उभारले जात असल्याचे प्रकार वाढले आहेत. विशेषतः वादग्रस्त ठिकाणी उभारण्यात आलेल्या अशा अनाधिकृत स्मारकांमुळे समाजात तणाव निर्माण होऊन सामाजिक सलोखा बिघडण्याची शक्यता वाढते. त्यामुळे अशा प्रकरणांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. दरम्यान, सामान्य प्रशासन विभागाने २ मे २०१७ रोजी पुतळा धोरणासंदर्भात शासन निर्णय जारी केला असून, त्यानुसार पुतळा उभारण्यासाठी जिल्हास्तरीय समितीची पूर्वपरवानगी आवश्यक आहे. तसेच पुतळ्याचे ठिकाण वादग्रस्त नसावे, वाहतुकीस अडथळा निर्माण होऊ नये, उंची व साहित्याला तांत्रिक मान्यता असावी, तसेच कायदा व सुव्यवस्था लक्षात घेऊन शपथपत्र व 'ना हरकत' प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे. या सर्व नियमांचे काटेकोर पालन करूनच पुतळे उभारावेत, अन्यथा संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी ठाम भूमिका डॉ. गणेश ढवळे यांनी यावेळी व्यक्त केली.

---

# झोका खेळताना खुर्ची कलंडल्याने ९ वर्षीय चिमुकलीचा गळफास लागुन दुर्दैवी मृत्यू

**माजलगाव । प्रतिनिधी**



माजलगाव शहरातील सन्मित्र कॉलनी, खंडोबा मैदान परिसरात एक अत्यंत हृदयद्रावक आणि दुर्दैवी घटना घडली आहे. घरात झोका खेळत असताना दोरी गळ्याला अडकून एका ९ वर्षीय बालिकेचा मृत्यू झाला आहे. वृंदा समीर रुद्रवार असे या मृत मुलीचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी महावीर जयंतीनिमित्त शाळेला सुट्टी होती. वृंदा आपल्या लहान बहिणीसोबत घराच्या वरच्या मजल्यावर खेळत होती. खेळता खेळता ती खुर्चीवर चढून झोका पकडण्याचा प्रयत्न करत होती. त्याच वेळी अचानक खुर्ची कलंडली आणि तोल गेल्याने झोक्याची दोरी तिच्या गळ्याभोवती अडकली. यामुळे तिला गळफास बसला आणि या अपघातात तिचा जागीच मृत्यू झाला. वृंदा जेवण्यासाठी खाली का आली नाही, हे पाहण्यासाठी तिची आई वरच्या मजल्यावर गेली असता हा धक्कादायक प्रकार समोर आला. आपल्या मुलीला अशा अवस्थेत पाहून आईने मोठा टाहो फोडला. आवाजावरून कुटुंबातील इतर सदस्य धावत आले आणि त्यांनी तातडीने वृंदाला रुग्णालयात नेले, मात्र डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. तोपर्यंत खूप उशीर झाला होता. वृंदा ही ईगलवूड इंग्लिश स्कूलमध्ये दुसरीच्या वर्गात शिकत होती. तिच्या अशा अचानक जाण्याने रुद्रवार कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेमुळे संपूर्ण माजलगाव परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून सर्वत्र शोककळा पसरली आहे.

---

# लिंबागणेश पाणीपुरवठा विहिरीच्या मोटारची वायर दीड महिन्यात २ वेळा चोरी

### नेकनुर पोलिसांपुढे चोरट्यांचे आव्हान ! पोलिस प्रशासन घटनास्थळी दाखल

**बीड । प्रतिनिधी**



तालुक्यातील लिंबागणेश गावात ग्रामपंचायतीमार्फत सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनेतील विहिरीच्या मोटारीची विद्युत वायर गेल्या दीड महिन्यात तब्बल दोन वेळा चोरीला गेल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. गावाच्या पिण्याच्या पाण्याचा मुख्य स्रोत असलेल्या या योजनेवर परिणाम होत असून पाणीटंचाईचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

या वारंवार होणाऱ्या चोरीमुळे ग्रामपंचायतीवर मोठा आर्थिक बोजा पडत असून आतापर्यंत सुमारे दीड लाख रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती सरपंच बालासाहेब जाधव यांनी दिली. यापूर्वी झालेल्या चोरीबाबत नेकनुर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली होती. मात्र, पुन्हा चोरी झाल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. पोलिसांनी तातडीने कारवाई करून चोरट्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी करण्यात येत आहे.

दरम्यान, आज (दि.०४) नेकनुर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे व लिंबागणेश पोलीस चौकीचे सहाय्यक फौजदार विठ्ठल राठोड यांनी भायाळा साठवण तलाव परिसरातील चोरीच्या घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, डॉ. गणेश ढवळे, विक्रांत वाणी, विनायक वाणी, शिवाजी वाणी तसेच पाणीपुरवठा कर्मचारी सुखदेव वाणी उपस्थित होते.

डॉ. गणेश ढवळे यांनी सांगितले की, भायाळा साठवण तलावातून लिंबागणेश व पोखरी गावांना पाणीपुरवठा केला जातो. अशा परिस्थितीत सार्वजनिक विहिरीच्या मोटारींच्या वायरची वारंवार चोरी होणे हे गंभीर असून चोरट्यांनी पोलिस प्रशासनालाच आव्हान दिले आहे. यामुळे ग्रामस्थांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत असून चोरट्यांचे मनोबल वाढत आहे. त्यामुळे तातडीने कारवाई करून चोरीच्या घटनांना आळा घालावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

---

# प्रशासनाने जनतेसह निवडणूक आयोग आणि शासनालाही मूर्खात काढलं : एस.एम.युसूफ

**बीड । प्रतिनिधी**



सध्या संपूर्ण महाराष्ट्रात निवडणूक आयोगामार्फत मतदारांची एसआयआर प्रक्रिया सुरू आहे. बीड जिल्ह्यात सुद्धा ही प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या प्रक्रियेत दिनांक ३१ मार्च २०२६ रोजी प्रशासनाने जिल्ह्यात ७४.९५ टक्के मतदारांची एसआयआर प्रक्रियेत नोंद झाल्याचे जाहीर केले आहे. जाहीर करण्यात आलेल्या टक्केवारीत प्रशासनाकडून जनतेसह निवडणूक आयोग आणि शासनालाही मूर्खात काढण्यात आल्याचा घणाघात मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी केला आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, फक्त एका समाजाच्या बळावर बीड जिल्ह्यात एसआयआर प्रक्रियेत सरासरी ७४.९५% मॅपिंग होतेच कशी? असा प्रश्न उपस्थित करून म्हटले आहे की, एसआयआर प्रक्रिया ही १ मार्च पासून राबविण्यात येणार होती परंतु ६ मार्च पर्यंत ती सुरूच करण्यात आली नाही. याकरिता ६ मार्च रोजी जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले आणि ७-८ मार्च रोजी प्रसिद्धी माध्यमातून याविषयी बातम्या प्रसिद्ध झाल्यावर ८ मार्चपासून प्रशासनाने नियुक्त केलेले बीएलओ कमी अधिक प्रमाणात या कामासाठी बाहेर पडले आणि बघता बघता फक्त २३ दिवसांमध्ये गेवराई ७७.७९, माजलगाव ७६.३७, बीड ६५.९७, वडवणी ७७.३३, धारूर ७३.४५, शिरूर ९१.१०, आष्टी ८०.२५, पाटोदा ८६.३०, परळी ६४.४८, केज ७८.८१, अंबाजोगाई ७७.१२ अशी एसआयआर प्रक्रियेमध्ये मॅपिंग झालेली जिल्हा निहाय सरासरी ७४.९५ दाखविण्यात आली आहे.

काय कमाल आहे बुवा! ही आकडेवारी पाहता हसावे की रडावे हेच कळेनासे झाले आहे. कारण जेव्हापासून एसआयआर प्रक्रिया राबविणे सुरू झाले तेव्हापासून ते आजपर्यंत या प्रक्रियेत नाव नोंदणी करण्याकरिता समाजात असलेल्या एकूण समाजापैकी फक्त एकाच समाजाचे लोक यात आपल्या नावाचे मॅपिंग व्हावे म्हणून धावपळ करत असल्याचे दिसत आहेत. इतर समाजाचे लोक आपल्या नावाची नोंदणी करणे तर दूर या प्रक्रियेचे साधे नाव सुद्धा आपल्या तोंडाने घेत असल्याचे दिसत नाही. शिवाय ही प्रक्रिया राबविण्याकरिता बीएलओंनी घरोघरी फिरणे आवश्यक असताना घरोघरी न जाता एकाच ठिकाणी कुठेतरी बसून ही प्रक्रिया राबविणाऱ्या बीएलओंकडे एका समाजाशिवाय दुसऱ्या कोणत्याही समाजाचे लोक नाव नोंदणी करण्याकरिता जात असल्याचे दिसून आले नाही. यामुळे फक्त एका समाजाच्या जीवावर आणि तेही त्या समाजातील सुनांची मॅपिंग न करता कारण सन २००० नंतर लग्न होऊन सुना झालेल्या महिलांचे मॅपिंग या प्रक्रियेत होत नसताना सुद्धा चक्क ७४.९५% मॅपिंग झाल्याची जी आकडेवारी प्रशासनाकडून जाहीर करण्यात आली आहे ती पटणारी व पचणारी नाहीच. शिवाय एका समाजाच्या नाव नोंदणीमुळे जर एवढी टक्केवारी येत असेल तर त्या समाजातील मतदारांची जनसंख्या एवढ्या मोठ्या संख्येने खरंच आहे का? असा प्रश्नही या अनुषंगाने उपस्थित होत आहे. आणि जर या एका समाजाचे मतदार एवढ्या मोठ्या संख्येने आहे तर त्या समाजाला निश्चितपणे मग अल्पसंख्यांक समाज न म्हणता बहुसंख्य समाज म्हणावे लागेल.

एकंदरीत गेल्या जवळपास महिनाभरातील घडामोडींकडे पाहिले असता बीएलओ आणि प्रशासनाने मिळून जाहीर केलेल्या टक्केवारीत जनतेसह निवडणूक आयोग आणि शासनालाही मूर्खात काढण्यात आल्याचा घणाघात मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी केला आहे.

साप्ताहिक, विश्वनायक हे पत्र, प्रकाशक, मालक, संपादक, **शेख बिलाल शेख युसूफ** यांनी मुद्रक, जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै, जि.बीड महाराष्ट्र -४३११२२ येथे छापून साप्ताहिक विश्वनायक कार्यालय, घर क्रं.१/१०/६६ खासबाग, खाजानगर, तुळजाभवानी मंदिर जवळ, ता,जि, बीड, महाराष्ट्र -४३११२२ येथे प्रकाशित केले, **(साप्ताहिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही. *वाद विवाद जिल्हा न्यायालया अंतर्गत)** मो. 8686888898
ई-मेल- vishvanayak94@gmail.com

The weekly newspaper, Vishvanayak, is published by its publisher, owner, and editor, Sheikh Bilal Sheikh Yusuf. It is printed at Jagmitra Offset, near Bajiprabhu Nagar, Nehru Chowk, Parli Vaijnath, Taluka Parli Vaijnath, District Beed, Maharashtra - 431122, and published from the Vishvanayak Weekly office, House no,1/10/66,Khasbag, Khajanagar, near Tuljabhavani Temple, Taluka & District Beed, Maharashtra - 431122. (The editor may not necessarily agree with the content and news in the weekly publication.*Disputes are subject to the jurisdiction of the district court) Mobile: 8686888898 - Email: vishvanayak94@gmail.com